मराठे प्रतिष्ठान मुंबई यांचे मुखपत्र

परस्परं भावयन्तः

म प्र

# हितगूज

अंक ५६ ● संपादक : लक्ष्मण शंकर (पृष्ठ ५२०) ● डिसेंबर २००३

(व्यक्तींची नावे देताना 'मराठे' आडनाव वगळले असून कंसात कुलवृत्तांतातील माहितीचा पृष्ठ क्रमांक दिला आहे.)

(फक्त खाजगी वितरणासाठी)




(१) प्रवेशाद्वाराजवळ सौ. सुवर्णा मराठे यांनी काढलेली फुलांची रांगोळी (२) कुलबांधवानी मांडलेले स्टॉल. (३) श्री. सुहास दीक्षित यांचे रेल्वे प्रदर्शन. (४) कार्यकारी मंडळ, पुणे. (५) सुहास्य वदने स्वागत - सौ. मोनिका महाजन व सौ. मंजिरी अरुण. (६) सतीश मराठे यांची मुलाखत घेताना श्री. विनायक लिमये व श्री. गजाननराव मराठे (सूत्रसंचालन - सौ. नीलिमा पटवर्धन) (७) श्री. सतीश मराठे यांचा सत्कार करताना विंग कमांडर य. ल. मराठे (८) डॉ. सुधाकर मराठे यांचे सुश्राव्य संगीत (९) मंत्रघोष - सौ. मंगला काशिनाथ (१०) ईशस्तवन - रोहन प्रमोद चित्ररचना - राजाभाऊ मराठे, मुंबई.

मराठे प्रतिष्ठान अखिल भारतीय ७वे अधिवेशन - पुणे

**मराठे प्रतिष्ठान**

पब्लिक ट्रस्ट नोंदणी क्र. ई. ७९१८ (मुं. ता. १२/१/१९८१) मराठे उद्योग भवन,
प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५. दूरध्वनी : २४३०२४५३.

Marathe Pratishthan

# अधिवेशनाची क्षणचित्रे




(१) श्रीमती प्रमिलाताई मराठे यांचा ८०च्या पुढील व्यक्तिमधील सत्कार.
(२) खगोल ऑलिम्पियाड विजेती राधिका मराठे यांचा सत्कार.
(३) शंकर कृष्णाजी/सौ. सुधा यांचा लग्नाच्या ४७व्या वाढदिवसानिमित्त सत्कार.
(४) म. प्र. चे अध्यक्षांचा सत्कार करताना स्वागताध्यक्ष.
(५) सुरेशभाऊंना आदरांजली वाहताना म. प्र. चे अध्यक्ष अरविंदराव.
(६) दीपप्रज्वलन करताना वा. ग. मराठे
(७) माधव मराठे निवेदन करताना.
(८) रक्ततपासणी - हिमोग्लोबीन/रक्तगट
(९) केसांची तपासणी
(१०) तणावमुक्त जीवनावरील कार्यशाळा - श्री. अनुरुप मराठे
(११) तरुणवर्गासाठी फॉर्म्युला फॉर सक्सेस
(१२) गटचर्चेचे एक दृश्य
(१३) सौ. अनिता रघुनाथ - सुगम संगीत सादर करताना

चित्ररचना - राजाभाऊ मराठे, मुंबई.

# मला भावलेले अधिवेशन

**- विनायक केशव** (पृ.२०) वरळी, मुंबई

मराठे प्रतिष्ठानचे ७वे अधिवेशन २२ ते २४ डिसेंबर २००३ रोजी पुण्यांत मोठ्या दिमाखात पार पडले.

दि. २२ डिसेंबर रोजी अधिवेशनाचे रीतसर उद्घाटन झाले. प्रतिष्ठानच्या अध्यक्षांनी प्रतिष्ठानची उद्दिष्टे पार पाडण्याकरिता कार्यकर्त्यांनी अधिक प्रयत्न करावे हे सांगताना तरुणांसाठी खास कार्यक्रम आयोजित करावे अशी सूचना केली.

करमणुकीच्या कार्यक्रमांत ३ ।।-४ वर्षांच्या मुलांपासून नव्वदीच्या ज्येष्ठ भगिनीपर्यंत सर्वांनी उत्साहाने भाग घेतला. अधिवेशनात महिला वर्गाचा सहभाग उल्लेखनीय होता. छोट्या छोट्या गोष्टी, नाटुकली, पथनाट्ये यांपासून गायन, कीर्तनापर्यंत कार्यक्रमांत विविधता होती. शेवटी कळस म्हणून सौ. अनुराधा मराठे यांचे चांगले दोन तास सुश्राव्य गायन झाले व अधिवेशनाचा 'संगीत' समारोप झाला.

या अधिवेशनात **दोन गोष्टी उल्लेखनीय** होत्या. **एक म्हणजे विद्यार्थ्यांची बैठक.** प्रतिष्ठानचे **धडाडीचे कार्यकर्ते कर्नल प्रमोदन मराठे** यांनी याबाबतीत पुढाकार घेतला होता. विद्यार्थ्यांनी आपली क्षमता कशी ओळखावी, कशी वाढवावी व जीवनात कसे यशस्वी व्हावे याचा वस्तुपाठ त्यांनी अगदी सोप्या शब्दात, छोटे छोटे आलेख काढून दिला. छोटी मंडळी तर खूष झालीच; पण उपस्थित असलेले ज्येष्ठ सुद्धा उत्साहाने व कौतुकाने चर्चेमध्ये भाग घेत होते.

**दुसरी उल्लेखनीय गोष्ट म्हणजे उद्योजकांची बैठक.** जमलेल्या तरुण, धडपड्या उद्योजकांनी आपल्या अडचणी, आपल्या अपेक्षा अगदी मोकळेपणे सांगितल्या. कर्नलसाहेबांनी प्रत्येकाचे बोलणे शांतपणे ऐकून घेतले. अधिक माहिती मिळविली आणि उद्योजकाचे नांव, पत्ता, व्यवसाय, अपेक्षा, अडचणी यांची शिस्तवार लेखी नोंद घेतली. **हेमंत महादेव मराठे, रमाकांत विद्वांस, मोहन मराठे** या ज्येष्ठ व अनुभवी कुलबांधवांनी मार्गदर्शनपर विचार मांडले. या खेरीज मराठे परिवारातील ज्येष्ठ कुलबंधू व लघुउद्योगतज्ज्ञ, ठाणे लघुउद्योग संघटनेचे (टिसा) संस्थापक अध्यक्ष **मधुसूदन खांबेटे** यांनी चार युक्तीच्या गोष्टी सांगून कोणत्याही प्रकारची मदत वा मार्गदर्शन करण्याचे आश्वासन दिले.

समाधानाने, आश्वासनाने या तरुण उद्योजकांचे चेहरे फुलून गेले. आपण एकटे नाही, आपला परिवार मोठा आहे हेच जणू त्यांचे चेहरे सांगून जात होते.

**अधिवेशनाचे खरे फलित हेच नाही का?**

***

## 'सासर'च झालं 'माहेर'!

सम्मेलनाला येण्याची इच्छा होती अपार,
कसे जावे ह्याचा करत होते विचार
एकटेपणाने मन ग्रासले होते पार
'यगं'विनां कधी कोठे, गेले नव्हते फार
शंका होती मनात, होईल का आपले स्वागत?
'सासर'घरचे संमेलन, कोणीच नाही ओळखत
पण दोन दिवसांत, संदर्भ सारे पार बदलले
'सासर' कधी झाले 'माहेर', तेच नाही कळले

**- मीता यशवंत** (पृ.४४४), पुणे

* **पति यशवंत गजानन यांचे ७ मे २००२ रोजी निधन झाले. (पहा हितगुज जून २००२)**

---

# मराठे प्रतिष्ठानचे ७वे अखिल भारतीय अधिवेशन २२ ते २४ डिसेंबर २००३

**- सौ. निर्मला श्रीपाद, पुणे आणि सौ. शैला गोपाळ, कराड**

मराठे प्रतिष्ठानचे अधिवेशन पुण्यात घेण्याचे ठरले आणि पुणेकराच्यांत एक नवीन आनंद, उत्साह ओसंडू लागला. घरचेच कार्य जणू या दृष्टीने कार्यकारी मंडळातील सर्वजण झटू लागले.

**प्रामुख्याने सर्व जबाबदारी सौ. नीलांबरी मराठे** यांच्यावरच होती. सहकाऱ्यांच्या मदतीने त्यांनी कार्यक्रमाची आखणी फारच सुंदर केली. ज्ञानेश मंगल कार्यालयात तीन दिवस अगदी 'आनंदाचे डोही आनंद तरंग' या भावनेत सर्व उपस्थित बुडून गेले. एकापेक्षा एक दर्जेदार कार्यक्रम, मान्यवरांचे सत्कार, छोट्या-मोठ्या कलाकारांना प्रोत्साहन, योगावर मार्गदर्शन, तणावमुक्त जीवनाचे सूत्र, हिमोग्लोबीन व रक्ततपासणी, केसांची तपासणी व मार्गदर्शन, मनोगते, तरुणांसाठी मार्गदर्शन, रेल्वेचे वर्किंग मॉडेल दर्शन असे विविध कार्यक्रम घेण्यांत आले.

श्रीयुत शशिकांत मराठे यांनी तीन दिवस चहा, नाश्ता, भोजन व्यवस्था उत्तम केली. जोडीला भरपूर करमणूक. यामुळे गोवा, नॉर्थ कॅनरा, कोकण, भोपाळ, नागपूर, अमरावती, मुंबई, उत्तर प्रदेश, नाशिक येथून आलेले सर्व कुलबांधव व कुलभगिनी अतिशय खूष होऊन स्वगृही गेले.

२२ डिसेंबरला दुपारी ३ वाजल्यापासून सनईचे मंगल सूर, प्रवेशद्वारापाशी **सौ. सुवर्णा श्रीपाद** यांनी काढलेली फुलांची बहारदार रांगोळी आणि महाराष्ट्रीयन खासीयत असलेला पोषाख म्हणजे नाकात नथ व नऊवारी साडी नेसलेल्या माहेरवाशीण **सौ. मोनिका नरेंद्र महाजन** व सासुरवाशीण **सौ. मंजिरी अरुण मराठे** यांनी सर्वांचे पेढा व स्वागतिका देऊन हसतमुखाने स्वागत केले. स्वागतिका अंकांत पुणे परिसरात असलेल्या औद्योगिक संस्था, मंदिरे, शैक्षणिक संस्था, लष्करी आस्थापने यांविषयीची माहिती, पुणे शहराचा इतिहास, अधिवेशनाची कार्यक्रम पत्रिका इत्यादी माहिती दिलेली होती.

प्रवेशद्वारापासून सभागृहापर्यंत दोन्ही

Marathe Pratishthan

बाजूस मराठे परिवारातील उद्योजकांनी उत्पादित केलेल्या वस्तूंचे तसेच लेखकानी लिहिलेल्या पुस्तकांचे प्रदर्शन व विक्रीची व्यवस्था केलेली होती. संमेलनाचे स्वागताध्यक्ष विंग कमांडर यशवंत मराठे सभागृहात सर्वांचे स्वागत करत होते.

अधिवेशन संपवून परततांना प्रत्येक कुटुंबास संमेलनाची आठवण म्हणून स्थायी स्वरूपाचे भिंतीवरील कॅलेंडर देण्यात आले. माहेरवाशिणींची खणानारळाने ओटी भरून पाठवणी करण्यात आली. संक्रांतीची आठवण म्हणून प्रत्येकास तिळगूळ देऊन सर्वांचे तोंड गोड करण्यात आले.

**कै. सुरेशभाऊ मराठे,** प्रतिष्ठानचे संस्थापक व कै. श्रीधर परशुराम तथा **बापूसाहेब मराठे यांच्या स्मृतीला अभिवादन** करून पुढील सर्व कार्यक्रम घेण्यांत आले.

## *'परिचय' काव्य*

मराठे प्रतिष्ठान संमेलन परिचय कार्यक्रमांत मला मिळालेली सखी सौ. उर्मिला श्रीनिवास (पृ.३८९) पुणे ह्यांचा परिचय करून देताना दोन ओळी रचल्या त्या अशा -

मला भेटली सखी, आज संमेलनात
साम्य आहे दोघींच्या, पतीच्या नांवात

- **सौ. शुभदा श्रीनिवास** (पृ.२८०), ठाणे

पहिले दिवशी म्हणजे **सोमवार दिनांक २२-११-२००३ या दिवशी संध्याकाळी** ४ पासून **सौ. मंगला मराठे** यांच्या वैदिक ईशस्तवनाने कार्यक्रमास सुरवात झाली. नंतर **श्री. कालिदास मराठे,** गोवा **यांच्या कल्पनेप्रमाणे अभिनव तऱ्हेने परस्पर परिचयाचा कार्यक्रम झाला.** चिठ्ठ्या टाकून जोड्या ठरवल्या. जोडीदारांनी एकमेकांचे परिचय करून घ्यायचे व प्रत्येकाने दुसऱ्याचा परिचय सर्वांना करून द्यायचा. हा कार्यक्रम फारच रंगतदार झाला. योगायोगाने अनेक 'समानशील' जोड्या जमल्या. उदा. विनायक केशव मुंबई महापालिकेतून निवृत्त तर त्यांचे जोडीदार पुणे महापालिकेतून निवृत्त; लक्ष्मण शंकर आणि त्यांचे जोडीदार दोघेहि पुण्यातले, अगदी एकाच शाळेत शिकलेले. मराठ्यांची एक माहेरवाशीण व एक सासुरवाशीण यांची जोडी तर वैशिष्ट्यपूर्णच ठरली - मराठे पुरुष मंडळी अतिशय जमवून घेणारी असतात याबाबत दोघींचेहि अगदी एकमत! आहे ना खरे आश्चर्य?

## *अधिवेशनासाठी पुणे शाखेला मिळालेल्या देणग्या*

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. श्रीकृष्ण सिद्धेश्वर मराठे | १००० |
| २) | कर्नल प्रमोदन प्रभाकर मराठे | १००० |
| ३) | श्री. अरुण दत्तात्रय मराठे | १००० |
| ४) | श्री. रमेश रामचंद्र मराठे | १००० |
| ५) | सौ. नीलांबरी रमेश मराठे | १००० |
| ६) | श्री. श्रीनिवास गोपाळ मराठे | १००० |
| ७) | सौ. मीना भालचंद्र मराठे | १००० |
| ८) | श्री. प्रमोद विष्णू मराठे | १००० |
| ९) | डॉ. रामचंद्र लक्ष्मण मराठे | १००० |
| १०) | श्री. प्रभाकर गजानन मराठे | १००० |
| ११) | श्री. वामन गणेश मराठे | ५००० |
| १२) | सौ. अनुराधा मुकुंद मराठे | ५०० |
| १३) | श्री. श्रीराम व्यंकटेश मराठे | ५०० |
| १४) | श्री. यशवंत लक्ष्मण मराठे | ५०० |
| १५) | श्री. रघुनाथ गोविंद मराठे | ५०१ |
| १६) | श्री. हेरंब अच्युत चक्रदेव | ५०० |
| १७) | सौ. गौरी शेखर देव | ३०० |
| १८) | श्री. अरविंद महादेव चक्रदेव | ३०० |
| १९) | श्री. अच्युत महादेव चक्रदेव | १००० |
| २०) | श्री. काशिनाथ दत्तात्रय मराठे | २५०० |
| २१) | श्रीमती लीला ब. मराठे (युवा विकास कार्यासाठी) | १००१ |
| | **एकूण** | **२२६०२** |

**प्रतिष्ठानच्या विविध मध्यवर्ती निधींसाठी**
अधिवेशनाचे वेळी पुणे शाखेकडे मिळालेल्या देणग्या -

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. अरविंद मराठे, भूज यांची चुलत भावजय कै. वसुंधरा सदानंद यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ शिक्षण निधीसाठी | ५००१ |
| २) | काशिनाथ दत्तात्रय मराठे वैद्यकीय मदत निधीसाठी | २५०० |
| ३) | श्री. दिनकर रामचंद्र मराठे वैद्यकीय मदत निधीसाठी | १००० |
| ४) | श्रीमती लीला ब. मराठे | |
| | अ) शिक्षण निधीसाठी | १००१ |
| | ब) हितगुज वृद्धीसाठी | १००१ |
| | क) वैद्यकीय मदत निधीसाठी | १००१ |
| | ड) कुलवृत्तांताच्या कामासाठी | १००१ |
| | **एकूण** | **१२५०५** |

सायंकाळी ठीक ६ वाजता युनायटेड वेस्टर्न बँकेचे अध्यक्ष श्री. सतीश मराठे यांचे सभागृहात आगमन झाले. स्वागताध्यक्ष श्री. यशवंतराव मराठे यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला व त्यांच्या मुलाखतीस प्रारंभ झाला. श्री. गजाननराव मराठे (अर्थतज्ञ) व श्री. विनायक लिमये (वृत्तपत्र प्रतिनिधी) यांनी मुलाखत घेतली. ह्या मुलाखतीत श्री. सतीश मराठे ह्यांनी आपण ह्या पदापर्यंत कसे आलो हे सांगितले. अनेक कुलबांधवांनी श्री. सतीश मराठे यांना सहकारी बँकाविषयी, त्याना लागू होणारे नवीन नियम, व्याजांचे कमी होत असलेले दर इत्यादींबाबत प्रश्न विचारले. सर्व प्रश्नांना मुद्देसूद, समर्पक उत्तरे त्यांनी दिल्याने हा कार्यक्रम खूपच रंगला.

नंतर **डॉ. सुधाकर मराठे यांच्या शास्त्रीय** गायनाने लोक मंत्रमुग्ध झाले व त्या खुशीतच जेवणाचा लाभ सर्वांनी घेतला.

**मंगळवार दि. २३ रोजी** चहा व नाश्ता घेऊन कार्यक्रमास सुरवात झाली. त्यानंतर **रोहन मराठे यांनी ॐ नमोजी आद्या हे ईशस्तवन म्हटले** व **प्रतिष्ठानचे अध्यक्ष अरविंद दामोदर मराठे आणि अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष विंग कमांडर श्री. य. ल. मराठे** यांच्या हस्ते दीप प्रज्वलन झाले. **स्वागताध्यक्षांचा परिचय श्री. माधव मराठे** यांनी करून दिला. त्यांनी महाराष्ट्राबाहेर विंग कमांडर म्हणून Air force मध्ये नोकरी केली. सध्या महाराष्ट्रात स्थायिक आहेत. ३५ वर्षे एकूण हवाईदलांत नोकरी. प्रवास, सायकलिंग, ट्रेकिंग आवडते छंद आहेत.

**स्वागताध्यक्ष आपल्या भाषणांत म्हणाले,** आपल्याला खारीचा वाटा उचलता येतो याबद्दल धन्यता वाटते. हितगुज मासिकामुळे जवळीक साधली जाते. हितगुज फारच उपयुक्त आहे त्यासाठी संपादक लक्ष्मणराव मराठे यांचे हात सर्वांनी बळकट करावे. प्रतिष्ठानच्या कार्यक्रमांना बळकटी यावी म्हणून गोवा, पुणे, नागपूर, औरंगाबाद यांची ऑर्गनायझेशन तयार व्हावी व घोडदौडीसारखी वाटचाल करावी. प्रतिष्ठान विद्यार्थ्यांचा सत्कार, तरुणांना प्रोत्साहन

Marathe Pratishthan

व मार्गदर्शन करते या गोष्टी सत्य आहेत. यांत तरुणांचा सहभाग अधिकाधिक असावा. वालचंदचे उदाहरण डोळ्यापुढे ठेवून मराठे कुलबांधवांनी उद्योगधंद्यात शिरावे व स्वत:ची व राष्ट्राची प्रगती करावी. हितगुज कार्यकारी मंडळात तरुण असावे, त्यांच्या इच्छा अपेक्षांची नोंद घ्यावी अशी सूचनाही त्यांनी केली.

त्यानंतर **गुणी विद्यार्थ्यांचा त्यांच्या हुशारीबद्दल सत्कार** करण्यांत आला. त्यात राधिका मराठे, स्वराली मराठे, अक्षय मराठे इ. विद्यार्थ्यांचा समावेश होता. त्यापैकी **राधिका मराठेनी आंतरराष्ट्रीय खगोल ऑलेंपियाडमध्ये** जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग घ्यावा व खगोल शास्त्राची आवड निर्माण करावी असे मनोगत व्यक्त केले. नंतर अध्यक्ष-विश्वस्त अरविंदराव, कार्यवाह वि. के., कोषाध्यक्ष सी. गो. खांबेटे, हितगुज संपादक लक्ष्मणराव, सौ. नीलांबरी, प्रतिष्ठानच्या संकल्पनेचे मूळ कल्पक ना. बा. व वा. ग. मराठे आणि सुरवातीपासूनचे कार्यकर्ते सर्वश्री अरुणराव व शशिकांत (पुणे), आनंदराव (ठाणे), मोहन सदाशिव (मुंबई), कालिदास बाळकृष्ण (गोवा), तसेच अंध विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप परीक्षेची दारे उघडून देऊन त्यांना यशस्वी मार्गदर्शन करणाऱ्या शुभदा शंकर (पुणे) इत्यादि मान्यवरांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

**वा. ग. मराठे** यांनी आपल्या भाषणात आजीआजोबा व बंधू भगिनी यांचा उत्साह पाहून आनंद व्यक्त केला. एखादी संस्था २५ वर्षे चालून नावारूपास येणे, लोक तयार होणे हे फार महत्त्वाचे आहे. सुरेशभाऊंनी लावलेल्या रोपट्याची भरभराट पाहून समाधान व्यक्त केले व सत्काराबद्दल आनंद व्यक्त केला. **कालिदास मराठे** यांनीहि मुंबई-गोवा लोकांचा सत्कार केल्याबद्दल धन्यवाद दिले. तसेच **मोहनराव मराठे** यांनी वस्तूंचा संग्रह करण्यापेक्षा यापुढे माणसांचा संग्रह करीन असे मनोगत व्यक्त केले. पुण्यातले एक कारखानदार **अच्युतराव मराठे** यांनी असे सांगितले की १९२६ साली वडिलांनी स्थापन केलेल्या कंपनीत सुधारणा करून त्यांत नवनवीन उत्पादने काढून आता वेगळा माल (९७% उत्पादन) सिंगापूर, अमेरिका, मलेशिया वगैरे देशांना जातो. एच् फिलुंजर कंपनीचे नांव आहे.

**वि. के. मराठे यांनी प्रतिष्ठानचा अहवाल** सादर केला. मराठे प्रतिष्ठानची स्थापना झाल्यावर कुलवृत्तान्त तयार करण्यांत आला. हे कार्य पुढे चालू रहावे या सुरेशभाऊंच्या इच्छेप्रमाणे कुलवृत्तांताचे नूतनीकरण चालू असल्याचे त्यांनी सांगितले. गरजू विद्यार्थ्यांना आर्थिक मदत, गुणी विद्यार्थ्यांचा पारितोषिके देऊन सत्कार, तरुणांना उद्योगाबाबत मार्गदर्शन इ. उपक्रम राबवले जातात. सौ. नीलांबरी यांनी वधूवर संशोधन मंडळ हा स्तुत्य उपक्रम सुरू केल्याबद्दल त्याना धन्यवाद दिले. **सीताराम गोपाळ खांबेटे** यांनी कुलवृत्तांताचे नूतनीकरण करणार असल्याचे सांगितले. १०० लोकांची मागणी असल्यास झेरॉक्स प्रती काढून देऊ असे ते म्हणाले. मराठे यांची एकूण ६०,००० घरे आहेत. प्रत्येक घरी 'हितगुज'चा अंक गेला पाहिजे, सभासद वाढले पाहिजेत असे मत व्यक्त केले.

***ब्याण्णव कुळी की शाण्णव कुळी ?***

पुण्याचे रिक्षावाले गप्पिष्ट असतात. कार्यालयावरचा मराठे संमेलन हा बॅनर पाहून मला रिक्षावाल्याने विचारले, 'ब्याण्णव कुळी की शाण्णव कुळी?' मी क्षणभरच बुचकळ्यात पडले. नंतर मराठे जातीचे नव्हे तर मराठे आडनावाच्या ब्राह्मणांचा हा कार्यक्रम आहे असा खुलासा करताच ''काय तुमी पण....'' असे काहीतरी बोलत तो झर्रकन निघून गेला.

**- सौ. राधा श्रीकांत** (पृ.३७८) अंधेरी, मुंबई

तरुणांनी सर्व ॲक्टिव्हिटीजमध्ये भाग घेऊन आपले करीयर करावे. पर्सनल डेव्हलपमेंटसाठी मार्गदर्शन केले जाते ह्याचा जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी फायदा घ्यावा असे **प्रमोदन मराठे** म्हणाले.

यानंतर ८०च्या पुढे असणाऱ्या वृद्ध स्त्री-पुरुषांचा सत्कार, **सौ. मंगला मराठे** यांच्या आशीर्वादपर मंत्र, दीर्घायुषी मंत्र, मंत्रपुष्पांजली अशा घोषांत विविध व्यक्तींच्या हस्ते करण्यात आला. यामध्ये पुण्यातील गिरिजाबाई महादेव चक्रदेव आणि अनंत रामचंद्र, वामन आत्माराम ऊर्फ आण्णा, भास्कर अनंत दीक्षित-मराठे, प्रमिलाबाई भालचंद्र, मनोरमा गोपाळ, सुशिला दत्तात्रय व दत्तात्रय आत्माराम (मुलुंड) यांचा समावेश होता. तसेच अमृतमहोत्सवी पती-पत्नी, शंकर कृष्णाजी आणि सौ. सुधा शंकर (नाशिक) यांच्या लग्नाच्या ४७व्या वाढदिवसाचे औचित्य साधून त्यांचाहि सत्कार करण्यात आला.

**त्यानंतर संपादक हितगुज ल. शं. मराठे यांनी हितगुज वृद्धी व प्रसार** यावर भाषण केले. गेली १० वर्षे तिमाही अंक नियमितपणे निघतो आहे. २०० रु. वर्गणीच्या व्याजात १६ पानी अंक देता येत नाही; कुलबांधवांच्या मदतीमुळेच ते शक्य होते. वर्गणी वाढवली तर ती न देणारे अंकाला वंचित होतील. सबब कुलबांधवांनी सढळ हाताने हितगुज निधीला मदत करावी अथवा किमान ६०० रुपयांच्या (पाव पान) कायमस्वरूपी शुभेच्छा जाहिराती द्याव्या. पोस्टेज वाढल्यामुळे कुलबांधवांनी घरपोच अंक नेऊन द्यावे. त्यामुळे संपर्कही वाढेल. हे काम पुणे शाखा उत्तम रीतीने करीत आहे असे सांगून इतरत्रहि असा उपक्रम सुरू व्हावा अशी अपेक्षा व्यक्त केली. मराठ्यांच्यामध्ये कोणी 'वालचंद' असतील तर त्यांची हितगुजमध्ये प्रसिद्धीसाठी जरूर माहिती द्यावी. प्रचार आणि प्रसाराला सर्वांची साथ लाभावी असे मनोगत त्यांनी व्यक्त केले.

**प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री. अरविंद दामोदर मराठे यांनी कै. सुरेशभाऊ** यांना आदरांजली व कुलबांधवांना अभिवादन करून 'अभ्यासूनि बोलावे', नाहीतर फक्त ऐकावे हे समर्थवचन लक्षात घेऊन मी फार बोलणार नाही असे सांगितले. अनेक गुणी, यशस्वी मंडळी ह्या कुळांत आहेत. अनेक कार्यकर्ते एकत्र येऊन कार्य व निधी संकलन करतात. वैद्यकीय निधीत वाढ होणे गरजेचे आहे. अर्थात त्याचा लाभही कुलबांधवांनी घेतला पाहिजे. गरजू विद्यार्थ्यांनी लाभ न घेणे, निधी वापरा असे सांगावे लागणे ही खरोखरच चिंतनीय बाब आहे. त्यासाठी

Marathe Pratishthan

डोळसपणाने कुलबांधवांनी, पाठपुरावा करून, चौकशी करून गरजूंना लाभ द्यावा व तरुण कामाकडे कसे वळतील ते पहावे. तरुणांनी धावपळीची कामे करावी. मुलांच्यात शक्ती, बुद्धी, युक्ती आहे. पण त्यांना आकृष्ट केले पाहिजे. यात आपण कमी पडतो का त्याचे परीक्षण करावे. अभ्यासू, कवी, लेखक यांनी हितगुजला लेखन पाठवावे. समाजकार्य फार अवघड आहे. पण सवयीने साध्य होते. आत्मपरीक्षणाने स्वत:च्या चुका समजावून घ्याव्या, संबंध वाढवावे, सल्लागार मंडळ स्थापून तरुणांना मार्गदर्शन करावे, असे मनोगत व्यक्त करून नवीन वर्षाच्या शुभेच्छा सर्वांना दिल्या.

**दुपारी डॉ. र. ल. मराठे व डॉ. कानेटकर** यांनी स्त्रियांची रक्ताची हिमोग्लोबीन तपासणीची सोय केली. प्रत्येकाला आपले वजन, उंची, रक्तगट, हिमोग्लोबीन प्रमाण माहीत असावे असे ते म्हणाले. सबंध भारतभर डॉ. मराठे हिंडतात. त्यांनी हिमोग्लोबीन तपासणीबाबत मार्गदर्शन केले. त्यानंतर **श्री. प्रभाकर दामोदर मराठे** यांनी योगसाधनेवर भाषण केले. ते म्हणतात, ''योग म्हणजे दोन पिढ्यातील फरक जोडणे. तो स्वत: करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. तसेच त्याचे यम, नियम, ध्यान, समाधी इ. अंगवळणी पडले पाहिजेत.''

**दुपारी ४ ते ७ करमणुक** - विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम झाला. सरस्वतीपूजन होऊन उतारे वाचन, एकांकिका, भजन, गाणी, कीर्तन, स्वगत, कर्नाटक-गोव्यातील-चित्पावनी भाषेतील संवाद आणि विनोदी गाणी इ. मंत्रमुग्ध करणारा कार्यक्रम झाला. उत्कृष्ट व आकर्षक कार्यक्रमांना उत्तेजनार्थ बक्षिसे रमाकांत विद्वांस, मुंबई यांनी दिली. त्यात क्षितीजा, स्वराली, सायली मराठे यांचा समावेश आहे.

**दि. २४-१२-२००३** यादिवशी चहा नाश्ता झाल्यावर **श्री. अनुरूप मराठे** यांचे तणावमुक्त जीवनावरील भाषण झाले. अनेक तक्ते व तणावमुक्त जीवन या पुस्तकावरून त्यांनी उत्कृष्ट मार्गदर्शन केले. तणावमुक्त जीवन जगणे ही काळाची गरज आहे. ईश्वरचिंतनांत सकाळी लवकर उठून वेळ घालवावा. रात्री झोपण्यापूर्वी ईश्वरचिंतन करावे. २ मिनिटे डोळे मिटून सर्वांना ईश्वरचिंतन करण्यास सांगितले. तणावमुक्त जीवनासाठी १८ सोनेरी सिद्धान्त आहेत. आत्म्याचा स्वत:च्या गुणांच्या अनुभूतीचा विचार करावा. शांती हा प्रत्येक आत्म्याचा धर्म आहे. दोन भुवईतील जागा म्हणजे आत्म्याचे राहण्याचे ठिकाण, आत्मा आणि परमात्मा यांना जोडणे म्हणजे योग. काम, क्रोध, मत्सर, अहंकार यावर ताबा मिळवायचा. त्यानंतर डॉ. श्री. दाते व श्री. अनुप मराठे यांनीही तणावमुक्त जीवनावर विचार व्यक्त केले.

त्यानंतर **विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम झाला.** त्यांत तबलावादन, कीर्तन, भावगीत गायन - नाट्यगीत, नाट्यछटा (सुशीला मराठे), विनोदी गीत (निर्मला मराठे) हसू शब्दांवर कविता (नितिन मराठे) मोहन मराठे हास्य-कथाकथन इत्यादि खूप आकर्षक कार्यक्रम झाले. त्यांत तबलावादन करणारा छोटा कलाकार मिलिंद दिक्षित व सूर्यकिरण मराठे यांना प्रेक्षकांकडून उत्स्फूर्तपणे बक्षिसे देण्यात आली.

> ### *वरपक्षाचा पाहुणचार*
>
> पाहुनी पुण्यातिल सुन्दर अधिवेशन-मेळावा
> तृप्त झाले मन अती, शब्द नाही बोलायला
> व्यवस्थेमुळे उत्तम, भासली नाही उणीव यत्किंचित
> वर-पक्षाप्रमाणे झाला, पाहुणचार अति-व्यवस्थित
>
> **- श्रीमती सुधा लक्ष्मण** (पृ.९६), भोपाळ
> निवृत्त प्राचार्या, कन्या ज्युनियर कॉलेज

त्यानंतर **कर्नल प्रमोदन मराठे यांनी 'तरुणांसाठी विकास मार्गदर्शन'** यावर तरुणांपुढे मार्गदर्शन केले. प्रत्येकाने आपल्याला कोठे जायचे आहे, कोठे जावेसे वाटते व आपण कोण होणार याचा विचार सुरवातीपासून केला पाहिजे. ६०व्या वर्षी मी कोण असेन, कसा असेन व का? मनाला समाधान मिळेल तीच शाखा पत्करावी, नुसते पैशाकडे लक्ष नको. कदाचित काही वेळा नैराश्य पदरी येईल. मुलांचा कल ओळखून १०वी नंतर काय शिकायचे याचा निर्णय पालकांनी घ्यावा. १२वी नंतर पुन्हा विचार करावा. E + R = S हे सूत्र समजावून दिले. फिजिकल फिटनेस व जनरल नॉलेज, निरीक्षण याबाबत सतर्क राहिले पाहिजे. वाचन लक्षपूर्वक स्मरणांत राहील असेच करावे असे अतिशय उपयुक्त मार्गदर्शन विद्यार्थ्यांना केले.

त्यानंतर सर्वच उपस्थित, विशेषत: तरुणांसाठी, **गटचर्चेचा कार्यक्रम ठेवला होता. उपस्थितांचे चार वेगवेगळे गट करून ही चर्चा करण्यांत आली.** विषय होते. १) प्रतिष्ठानकडून तरुणांच्या अपेक्षा, २) माझी जीवनातील वाटचाल ३) कुटुंबसल्ला केंद्र - काळाची गरज, आणि ४) रक्तगट व वैद्यकीय चाचण्या की कुंडली यांपैकी कशाच्या आधारे लग्ने ठरवावी?

सर्वच गटांतील चर्चा रंगतदार झाल्याचे गटप्रमुखांनी चर्चेचा गोषवारा सभेपुढे मांडतांना सांगितले. आजच्या ताण-तणावग्रस्त जीवनात विशेषत: एकत्र कुटुंबपद्धती नष्ट होत असल्याने, त्रयस्थ पण जाणत्या व्यक्तींचे मार्गदर्शन मिळणे कुटुंबस्वास्थ्याच्या दृष्टीने आवश्यक बनल्याचे **वसंत भालचंद्र** यांनी सांगितले. रक्तगट व वैद्यकीय चाचण्या आणि पत्रिका दोन्ही गोष्टींचा अतिरेक टाळावा. त्यांचा समन्वय हवा. ३६ गुण जमलेली लग्नेहि फसतात तर पत्रिका न पाहता केलेली अनेक लग्ने यशस्वी होतात, असे **सूर्यकिरण अनिल** यांनी सांगितले.

'जीवनातील वाटचाल' चर्चेत प्रामुख्याने स्त्रियांनी हिरीरीने भाग घेतला. मराठी कुटुंबात अनेक लोक खाऊनपिऊन सुखी आहेत; शिक्षणास व नोकरीस प्राधान्य देऊन जगणारे आहेत. स्त्रिया प्रामुख्याने कौटुंबिक गरजेतून शिकल्या. मराठे कुटुंबीयांत अशा शिकलेल्या स्त्रियांचे प्रमाण बरेच आहे असे **अरुण गणेश** यांनी सांगितले.

> ### *पुणेकरांचे आतिथ्य*
>
> पुणेकरांची अतिथ्यशीलता हा समस्त साहित्यिकांचा आणि इतरांचाही कायम टिंगलीचा विषय असतो. पण या संमेलनाची चोख व्यवस्था ठेवून पुणेकरांनी या टिंगलीला कृतीतून सणसणीत प्रत्युत्तर केले आहे.
>
> **- सौ. राधा श्रीकांत** (पृ.३७८) अंधेरी, मुंबई

**तरुण उद्योगजकांशी चर्चेत कर्नल प्रमोदन प्रभाकर आणि प्रोजेक्ट कन्सल्टन्सी तज्ज्ञ मुंबईतले हेमंत महादेव यांनी मार्गदर्शन**

Marathe Pratishthan

केले. सुमारे २० तरुण आपल्या समस्यांबाबत जागरूकतेने विचार-चर्चा करण्यास पुढे आले. हे एक शुभचिन्हच. प्रत्येकाने स्वतंत्रपणे आपापले प्रश्न घेऊन यावे म्हणजे त्यांना त्या अनुषंगाने मार्गदर्शन करता येईल असे हेमंत महादेव यांनी त्यांना आश्वासन दिले.

कुलबांधवांचे मनोगत व्यक्त करतांना सर्वांनी पुणेकरांना व विशेषत: सौ. नीलांबरी मराठे यांना धन्यवाद दिले. कार्यक्रमाच्या उत्कृष्ट आखणीबद्दल स्वागत व अगत्याबद्दल बरेचजणांनी धन्यवाद दिले. गोव्यांतील संमेलनास उपस्थित राहण्याबद्दल सौ. शुभदा दीपक मराठे, शिरोडा-गोवा यांनी चित्पावनीतून आग्रहाचे आमंत्रण दिले.

नंतर नीलांबरी मराठे यांनी समारोप करतांना संमेलन यशस्वी करण्याबद्दल सहकारी कार्यकर्ते आणि उपस्थित कुलबांधवांचे आभार मानले. त्यानंतर माहेरवाशिणींचा फोटो काढण्यांत आला. त्यांची खणानारळाने ओटी भरून पाठवणी करण्यात आली.

संध्याकाळी **मराठ्यांची सासुरवाशीण सौ. अनुराधा मराठे यांचे सुश्राव्य गायन** सांगता समारंभासाठी ठेवले होते. अभंग, भावगीत, लावणी असे गाण्याचे विविध प्रकार गाऊन त्यांनी लोकांना मंत्रमुग्ध करून सोडले. सर्व लोक खूष होऊन वा वा करतच परतीच्या मार्गाला लागले. कार्यक्रमाची सांगता असणारा हा कार्यक्रम लोकांना फारच आवडला.

एकंदरीत पुणेकर, कार्यकारी मंडळ, इतर संबंधित आणि सर्व उपस्थित या सर्वांनी मिळून अधिवेशन उत्तम पार पाडले. याचा आनंद जाणाऱ्या प्रत्येकाच्या मुखावर दिसत होता. सर्वांनी उत्कृष्ट दाद दिल्यामुळे पुणेकरही मनोमनी खूष झाले व इतिकर्तव्यता झाल्याचा आनंद त्यांना मिळाला. धन्यवाद. ***

# सतीश मराठे यांची मुलाखत

***श्री. गजाननराव मराठे (अर्थतज्ज्ञ) व श्री. विनायक लिमये (वृत्तपत्र प्रतिनिधी) यांनी घेतलेल्या मुलाखतीचा गोषवारा शब्दबद्ध केला आहे श्री. माधव मराठे यांनी.***

श्री. सतीश मराठे ह्यांनी आपण ह्या पदापर्यंत कसे आलो हे सांगितले. ते म्हणाले महाविद्यालयात असताना त्यांचा विद्यार्थी परिषदेशी संपर्क आला व ते परिषदेच्या कार्यात हिरहिरीने भाग घेत होते. परिषदेचे कार्यकर्ते, कोषाध्यक्ष, छात्रशक्तीचे संपादक इत्यादी पदावर कामे केली. परिषदेमुळे अनेक विषयांचा सखोल अभ्यास करून मगच ते विद्यार्थ्यांचे किंवा शैक्षणिक प्रश्न उपकुलगुरूंसमोर किंवा राजकीय नेत्यांसमोर मांडत, चर्चा करत, यामुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व विकसित होऊ शकले. आणीबाणीच्या काळात त्यांना तुरुंगवास घडला.

१९६९ ते १९८८ ह्या काळात बँक ऑफ इंडिया मध्ये त्यांची पहिली नोकरी असताना त्यांना बँकेतील अनेक तऱ्हेच्या कामांचा अनुभव घेता आला. मिळालेल्या प्रत्येक संधीचा फायदा करून घेतला पाहिजे ह्या जाणीवेने ते प्रयत्न करत होते व यश मिळवत होते. पुढे १०-१२ वर्ष ते मुंबईतील जनकल्याण बँकेचे प्रमुख म्हणून त्यांनी काम पाहिले. सहकारी बँकेतील व्यक्तीला व्यावसायिक बँकेत अध्यक्ष म्हणून रिझर्व्ह बँकेने नेमलेले श्री. सतीश मराठे हे पहिले यशस्वी अध्यक्ष म्हणून ओळखले जातात. केवळ १ वर्षासाठी त्यांची नेमणूक झाली होती. त्यांच्या कामाचा धडाका पाहून रिझर्व्ह बँकेने त्यांना ३ वर्षाची मुदतवाढ दिली हे त्यांचे मोठे यश आहे. विद्यार्थी परिषदेचे श्री. यशवंतराव केळकर यांच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव आपल्यावर पडल्याचे त्यांनी एका प्रश्नाच्या उत्तरात सांगितले.

अनेक कुलबांधवांनी श्री. सतीश मराठे यांना सहकारी बँकाविषयी, त्याना लागू होणारे नवीन नियम. व्याजांचे कमी होत असलेले दर इत्यादी प्रश्न विचारले. त्याला उत्तरे देताना श्री. सतीश मराठे म्हणाले, काही सहकारी बँका संस्थाने बनू लागल्या आहेत. त्यावर बंधन यावे म्हणून R.B.I. ने नियम केले आहेत व ते योग्य आहेत. कमी होत जाणाऱ्या व्याजदराबद्दल ते म्हणाले, भारतीय अर्थव्यवस्था नवे वळण घेत असल्याने व भारतीय उत्पादने परदेशात मोठ्या प्रमाणात निर्यात होण्यासाठी त्या उत्पादनांच्या किमती जागतिक बाजारपेठेत सुसंगत असणे आवश्यक आहे. उत्पादकांना दिलेल्या कर्जावर कमी व्याजदर लावला तर उत्पादनाच्या किंमती कमी होऊ शकतात आणि म्हणून व्याजदर कमी करणे आवश्यक आहे.

वरिष्ठ नागरिकांनी आपले पैसे अधिक व्याजदर मिळण्यासाठी कुठे गुंतवावे असे कुलबांधवांनी विचारता योग्य त्या म्युच्युअल फंडामध्ये पैसे गुंतवावे असे मत त्यांनी व्यक्त केले. गुंतवणुकीच्या संधी वाढल्या आहेत त्याचा सर्वांनी फायदा घ्यावा पण जास्त परतावा मिळण्यासाठी निरनिराळ्या म्युच्युअल फंडांच्या कामाचा थोडा अभ्यास करून योग्य तिथे गुंतवणूक करावी असा सल्ला त्यांनी दिला. वरिष्ठ नागरिकांसाठी आणखी काही योजना येतील असा त्यांनी अंदाज व्यक्त केला. सर्व प्रश्नांना मुद्देसूद उत्तरे त्यांनी दिल्याने हा कार्यक्रम खूपच रंगला. ***

## आधी लगीन कोंडाण्याचे

**अधिवेशनाची लगीन घाई सुरू असतानाच सौ. नीलांबरी यांच्या घरचेच लग्न पार पडले. त्यांचे पती रमेश यांच्या कंपनीत वैद्यकीय तपासणी झाली असता त्यांची ॲन्जिओग्राफी करून बायपास करण्याचा सल्ला देण्यात आला. (मला ही गोष्ट अधिवेशन संपल्यानंतर कळली)**

**अशा सर्व तणावात 'आधी लगीन कोंडाण्याचे' अशा वृत्तीने सौ. नीलांबरी मराठे यांनी अधिवेशन यशस्वी केले; आणि श्रेय सहकाऱ्यांना वाटून टाकले. असे कर्तव्यदक्ष, निरलस कार्यकर्ते हीच मराठे प्रतिष्ठानची खरी दौलत.**

**श्री. रमेश मराठे यांची बायपास शस्त्रक्रिया २ जानेवारी २००४ रोजी यशस्वीपणे पार पडली. त्यांची प्रकृति सत्वर पूर्वपदाला येवो यासाठी सर्व मराठे कुलबांधवांच्या सदिच्छा. - संपादक**

Marathe Pratishthan

*अधिवेशन संयोजिकेचे हितगुज*

# कृतज्ञ मी, कृतार्थ मी

- **सौ. नीलांबरी रमेश** (पृ.२८०), पुणे

***अनेक लोकांनी संयोजिका या नात्याने मला धन्यवाद दिले. माझे अभिनंदन केले. परंतु या अभिनंदनाला मी एकटीच पात्र नसून पुणे कार्यकारिणीचे सर्व सदस्य व इतरही अनेक कुलबांधवांना त्याचे श्रेय आहे.***

पुण्यातील अखिल भारतीय ७व्या अधिवेशनाची संयोजिका या नात्याने तुमच्याशी थोडे हितगुज करण्याचा प्रयत्न करत आहे. अधिवेशनाला उपस्थित असलेल्या व्यक्तींपैकी बहुतेक जण सुखावले व तृप्त मनाने घरी गेले. त्यांनी आमच्या चुका पोटात घालून आम्हाला क्षमा करावी. अनेक लोकांनी संयोजिका या नात्याने मला धन्यवाद दिले. माझे अभिनंदन केले. परंतु या अभिनंदनाला मी एकटीच पात्र नसून पुणे कार्यकारिणीचे सर्व सदस्य व इतरही अनेक कुलबांधवांना त्याचे श्रेय आहे.

गेल्या २-३ महिन्यात अनेक कार्यकर्त्यांनी चांगल्या व नवनवीन कल्पना सुचवल्या आणि त्या आमलात आणून त्याची कार्यवाहीसुद्धा केली. त्यामुळेच हे अखिल भारतीय अधिवेशन आम्ही यशस्वी करू शकलो.

स्वागत करताना स्वागतिकेबरोबर तोंड गोड करण्यासाठी प्रत्येकाला **पेढा द्यावा ही कल्पना विजय विष्णू मराठ्यांची** आणि कृतीतही बिनबोभाट त्यांनीच आणली.

सत्कारार्थींना खऱ्या परंतु अल्पकाळ टिकणाऱ्या फुलांच्या पुष्पगुच्छाऐवजी **कायम स्वरूपी चांगल्या अवस्थेत राहणाऱ्या फुलांचा गुच्छ देऊ या ही कल्पना मांडली श्री. श्रीनिवास गोपाळ मराठे यांनी.** सपत्निक बाजारात जाऊन ती पूर्णत्वालाही नेली.

आमचे स्वागताध्यक्ष **विंग कमांडर श्री. यशवंत लक्ष्मण मराठे हे आमच्यासारखेच एखादे कार्यकर्ते असल्याप्रमाणे** पडेल ते काम करत होते. अनेक जबाबदाऱ्या अंगावर घेत होते. नवनवीन कल्पना सुचवत होते. योग्य मार्गदर्शन करत होते. त्यामुळे ते आमच्यातलेच एक होऊन गेले होते. कुठल्या कामात तुला मदत पाहिजे का? असे अधूनमधून फोन करून वारंवार विचारत होते. त्यामुळे त्यांच्याबद्दल सर्वांच्याच मनात खूप जवळीक निर्माण झाली आहे.

रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त पुणे शाखेतर्फे **एखादे स्मृतिचिन्ह द्यावे. या कल्पनेचा पाठपुरावा करण्यासाठी सौ. मीना व श्री. भालचंद्र मराठे** या जोडीने व **श्री. अच्युत चक्रदेव** यांनी खूपच कष्ट घेऊन त्याची पूर्तता केली.

आता संक्रांत जवळ आली आहे. म्हणून जातानाही **तिळगूळ देऊन सर्वांचे तोंड गोड करुन निरोप देऊया अशी कल्पना मांडून श्री. माधव वासुदेव मराठे** यांनी आयत्या वेळेला कृतीतही आणली.

## निरोप देतो तुम्हाला

घेऊनी स्मृतीचा सुगंध
स्नेहभाव जपण्यांत आनंद,
प्रेम जिव्हाळा संमेलनिचा,
सौख्याचे क्षण हृदयात,

अमूल्य ठेवा जपुनि मनात,
कृपा दृष्टि तुम्ही ठेवा,
निरोप देतो तुम्हाला ।।१।।

सहवासाची अवीट गोडी,
संधी सेवेची ही थोडी
सद्भावांच्या भावफुलांनी,
सेवा निशिदिनि केली

उणे कांहि जर चुकुन राहिले,
क्षमा असावी आम्हांला
हात जोडुनी भरल्या नयनी
निरोप देतो तुम्हाला ।।२।।

- **सौ. निर्मला श्रीपाद**, पुणे

## थकले रे नंदलाला....

सौ. अनुराधा मराठे यांनी सादर केलेले 'थकले रे नंदलाला' हे गीत सौ. नीलाबरींना अगदी शंभर टक्के लागू पडत होते. त्यांच्या चेहऱ्यावरचा 'अति मी दमले' चा भाव सहज कळत होता.

- **सौ. राधा श्रीकांत** (पृ.३७८) अंधेरी, मुंबई

अशा कितीतरी कल्पना आहेत. परंतु सर्वांचा उल्लेख करणे येथे शक्य नाही. पण वर दिलेल्या काही उदाहरणांवरून मला एवढेच सांगायचे आहे की पुण्यातील कार्यकारिणीचे सर्व सदस्य व गरजेनुसार पडेल ते काम करणारे इतरही अनेक कुलबांधव या सर्वांचे मला मोलाचे सहकार्य लाभले - अगदी **८७ वर्षांच्या प्रमिलाताई मराठे** यांचेसह.

आता आमच्यातल्या त्रुटी किंवा उणीवा. आम्ही २२/१२ ला संध्याकाळी Quiz Competition आयोजित केली होती. कार्यालयाच्या सोयीसाठी ती रात्री घेण्याचे ठरवले. परंतु पुरेशी उपस्थिती नाही म्हणून ती रद्द करावी लागली. काही युवक, बंधू व भगिनी या स्पर्धेत भाग घेण्यासाठी खूप उत्सुक होते म्हणून हितगुजच्या माध्यमातून ही स्पर्धा घेण्याचा निश्चित प्रयत्न करू.

अनेक कुलबांधवांनी स्वत: लिहिलेल्या पुस्तकांचे किंवा स्वत: तयार केलेल्या वस्तूंचे, खाद्यपदार्थांचे प्रदर्शन व विक्री करण्याचे तर काहींनी प्रसार करण्याचे स्टॉल मांडले होते. या सर्वांना चांगला प्रतिसाद मिळाला. त्यामुळे हॉलमधे कार्यक्रम चालू असतांना बाहेरील आवाजाचा खूप त्रास होत होता. म्हणून आपले कुलबांधव श्री. अरुण अच्युत मराठे यांनी महत्वाची सूचना केली की तुम्ही स्टॉल पूर्ण वेळ ठेवू नका. अधिवेशन काळातील ठराविक दिवस व ठराविक वेळीच स्टॉल मांडावे म्हणजे चालू कार्यक्रमात व्यत्यय येणार नाही.

आणखी एक महत्त्वाची सूचना माहेरवाशीण **सौ. दीपाली वसंत जोशी** हिने मांडली की मराठे प्रतिष्ठानचे **अधिवेशन सुट्टीला**

*(पुढे पान १८ वर)*



Marathe Pratishthan

# प्रतिष्ठान वृत्त

### कार्यकारी मंडळ सभा

दर महिन्याच्या **१ल्या** शनिवारी कार्यकारी मंडळाची सभा घेतली जाते. सभेच्या दिवशी सायं. ५ वाजता कोणीहि कुलबांधव कार्यकारी मंडळाला भेटण्यासाठी येऊ शकतो.

मागील तिमाहीत सप्टेंबर २०, ऑक्टोबर ११ व १८ आणि नोव्हेंबर ८ रोजी कार्यकारी मंडळाच्या सभा झाल्या. जमाखर्च मंजुरी व पत्रव्यवहाराची नोंद या नित्य व्यवहाराच्या बाबींशिवाय प्रतिष्ठानच्या डिसेंबर मध्ये पुण्यात व्हावयाच्या अधिवेशनाबाबतचे विनंतीपत्र तसेच खर्चाचा अंदाज पुणे शाखेतर्फे सादर करण्यात आला. त्यावर चर्चा होऊन खर्चाची भरपाई करण्याच्या दृष्टीने अधिवेशन स्मरणिका काढून जमा-खर्चातील तूट भरून काढण्यात यावी, तरीहि तूट राहिल्यास मध्यवर्ती कार्यालयाने जास्तीत रु. २५००० पर्यंत यासाठी मंजूर करावे असे ठरविण्यांत आले.

### वार्षिक सर्वसाधारण सभा

प्रतिष्ठानची २१वी वार्षिक सर्वसाधारण सभा चंद्रशेखर सोसायटी हॉल, विजयनगर सोसायटी, अंधेरी पूर्व येथे रविवार दि. ७.१२.२००३ रोजी सकाळी ९.३० ते दुपारी १.३० पर्यंत झाली. सभेला प्रतिष्ठानचे सभासद तसेच गुणवत्ता पारितोषिकधारक विद्यार्थी-विद्यार्थिनी आणि त्यांचे पालकवर्ग असे सुमारे ५० जण उपस्थित होते. (वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृत्तान्त याच अंकात स्वतंत्रपणे छापला आहे.)

वार्षिक सर्वसाधारण सभेचे कामकाज संपल्यानंतर प्रतिष्ठानचे ज्येष्ठतम उपस्थित कुलबांधव, सहस्रचंद्रदर्शनी **दत्तात्रय आत्माराम** (पृ.३३६) **यांच्या हस्ते आठ उपस्थित गुणवत्ताधारकांना पारितोषिके** देण्यांत आली. पुण्यांतील सर्व विद्यार्थी वगळून अन्य गुणवत्ताधारकांची पारितोषिके टपालाने पाठवण्यात आली. पुण्यातील विद्यार्थ्यांना पुणे अधिवेशनात पारितोषिके देण्यात आली.

### ७वे अखिल भारतीय अधिवेशन

याआधीचे प्रतिष्ठानचे अ. भा. अधिवेशन रत्नागिरी येथे ऑक्टोबर १९९७ मध्ये झाले होते. त्यानंतर २२ ते २४ डिसेंबर २००३ रोजी पुण्यांत म. प्र. चे ७वे अ. भा. अधिवेशन झाले. अधिवेशनात सुमारे अडीचशे कुलबांधव सहभागी झाले. (अधिवेशनाचा वृत्तान्त याच अंकांत स्वतंत्रपणे छापला आहे.)

### गोमंतक मराठे परिवार संमेलन

८ व ९ फेब्रुवारी २००२ रोजी मुळगांव येथे पहिले गोमंतक मराठे परिवार संमेलन झाले होते. यावेळी दरवर्षी असे संमेलन घेण्याचा संकल्प करण्यात आला होता. त्यानुसार **यंदाचे संमेलन २२ व २३ नोव्हेंबर २००३** रोजी श्रीवामनेश्वर देवस्थान सभागृह, ढवळी, फोंडा येथे घेण्यात आले. विशेष म्हणजे कोकणस्थांच्या चित्पावन बोलीवर डॉक्टरेट मिळवणाऱ्या डॉ. सौ. वसुधा भिडे प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. (या सम्मेलनाचा वृत्तान्त याच अंकात स्वतंत्रपणे छापला आहे.)

गोवा सरकारमधील निवृत्त शिक्षण संचालक **कालिदास बाळकृष्ण (पृ.५४१) यांच्या मार्गदर्शनाखाली गोमंतक मराठे परिवाराने प्रतिवर्षी एकत्र जमून** परस्पर विचारांची देवाणघेवाण करण्याचा **आदर्श निर्माण केला आहे**. त्याशिवाय मधेहि वर्षात एक-दोन वेळा काही ना काही निमित्ताने ते एकत्र जमत असतात. त्यांचा **हा कित्ता इतरहि गावांतल्या कुलबांधवांनी गिरवावा अशी अपेक्षा**. यामुळे कुलबांधवांमधील भावबंध अधिकाधिक दृढ होण्यास निश्चितच मदत होते.

### हितगुज

सप्टेंबरच्या हितगुजमध्ये डिसेंबरमध्ये पुण्यात होणाऱ्या अधिवेशनाचा तपशील देणे आवश्यक होते. संमेलनाची एकूण रूपरेषा निश्चित होऊन कुलबांधवांना करावयाचे आवाहनपत्र पक्के व्हायला सप्टेंबरची २० तारीख उजाडली. त्यामुळे सप्टेंबरचा अंक वाचकांना सप्टेंबरच्या १५ तारखेपूर्वी न पोचता ऑक्टोबरच्या १५ तारखेच्या दरम्यान पोचला. **तोपर्यंत अंक अजून का आला नाही अशी विचारणा पत्राने व फोनवर बऱ्याच वाचकांनी केली. कुलबांधव हितगुजची उत्कंठेने वाट बघत असतात हे कळून समाधान वाटले.** हाहि अंक डिसेंबर ऐवजी जानेवारी १५च्या दरम्यान आपणास मिळत आहे. कारण अर्थातच पुणे संमेलन वृत्तान्त आपणास त्वरेने पोचावा हे!

***

## २१वी वार्षिक सर्वसाधारण सभा
## ७.१२.२००३

- **विनायक केशव** (पृ.२०) वरळी, मुंबई, कार्यवाह, मराठे प्रतिष्ठान

मराठे परिवारातील गेल्या वर्षी निधन पावलेल्या सर्व ज्ञात व अज्ञात कुलबांधवाना दोन मिनिटे स्तब्धता पाळून श्रध्दांजली अर्पण केल्यानंतर कार्यवाह वि. के. मराठे यानी सभेची नोटीस वाचून दाखविली.

अध्यक्षानी सर्व उपस्थितांचे स्वागत करून सभेच्या कामाला सुरवात केली.

दि. १८-८-२००२ रोजी भरलेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कार्यवाह वि. के. मराठे यानी वाचून दाखविले. हे इतिवृत्त सभेने एकमताने मंजूर केले. पाठोपाठ गेल्या वर्षाचा ताळेबंद, जमाखर्च व कार्यकारी मंडळाचा वार्षिक अहवाल सभेपुढे ठेवण्यात आला. दिवसेंदिवस व्याजाचा दर कमी होत आहे. त्यायोगे मिळणारी रक्कमसुध्दा कमी होत आहे. यावर उपाय म्हणून बँकाशिवाय इतर संस्थांमध्ये गुंतवणूक करता येईल कां याचा विचार करण्याचे आश्वासन अध्यक्षानी सभेला दिले.

त्यानंतर मराठे परिवारातील प्रत्येक कुटुंबातील १८ वर्षाच्या वर असलेल्या व्यक्तीने आजीव सभासद होणे आवश्यक आहे असा विचार वि. के. मराठे यानी सभेपुढे मांडला. त्यावर वामन चक्रदेव यानी प्रत्येक मिळवत्या

*(पुढील मजकूर पान ११ वर....)*



Marathe Pratishthan

# सभासद वृत्त

मानसन्मान

**'प्रथम भारतीय वैमानिक'चे लेखक अनंत रामचंद्र**

मुंबईतले प्रतिष्ठानचे जुने, जाणते सभासद **अनंत रामचंद्र** (पृ.३९२), सध्या वास्तव्य पुणे, यांनी रत्नाकर वाशीकर यांच्यासह संयुक्तपणे लिहिलेले 'पहिला भारतीय वैमानिक' (त्याचे नाव दत्तात्रय लक्ष्मण पटवर्धन) हे पुस्तक मुंबईत ग्रंथाली तर्फे थाटामाटांत प्रसिद्ध करण्यांत आले. प्रतिष्ठानतर्फेहि १८.१०.२००३ रोजी झालेल्या कार्यकारी मंडळाच्या सभेत अनंतरावांचा श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यांत आला.

**तज्ञ बँक संचालक अभिजित फडणीस**

प्रतिष्ठानचे ठाणे येथील सभासद **अभिजित प्रभाकर फडणीस** (पृ.२२७) यांची ठाणे जनता सहकारी बँकेवर तज्ञ संचालक म्हणून नियुक्ती करण्यांत आली आहे. ते CA व ICWA परीक्षेतील गुणवत्ताधारक असून आर्थिक सल्लागार म्हणून स्वतंत्र व्यवसाय करतात.

**विठ्ठल महादेव यांचा १ला कथासंग्रह**

सांगलीतले प्रतिष्ठानचे कार्यकर्ते **विठ्ठल महादेव** (पृ.२३५). नोकरीच्या काळात त्यांना विविध प्रकारचे अनुभव आले; नाना स्वभावाच्या व्यक्तींशी संबंध आला. निवृत्तीनंतर त्यांनी कथा-लेखनाला सुरवात केली. निरनिराळ्या नियतकलिकांत आणि मासिकांत त्यांच्या अनेक कथा प्रसिद्ध झाल्या. हितगुजमधेहि आतांपर्यंत त्यांच्या ४-५ कथा प्रसिद्ध झाल्या.

**'जीवनधारा' हा त्यांच्या १६ कथांचा संग्रह** नुकताच प्रसिद्ध झाला. (प्रकाशक उद्वेली बुक्स, बी-४, रश्मी कॉम्प्लेक्स, मेंटल हॉस्पिटल मार्ग, ठाणे (प.), फोन : २५८१०९६८.)

माणसातल्या चांगल्या प्रवृत्तींचे दर्शन घडवणे हे त्यांच्या कथांचे वैशिष्ट्य. त्यांचे कडून अशाच सकस कथा यापुढेहि वाचायला मिळाव्या यासाठी त्यांना कुलबांधवांतर्फे शुभेच्छा.

**वर्ल्डकप टीम मधे सुशांत हेमंत?**

डाक्का येथे फेब्रुवारी २००४ मधे होणाऱ्या दुसऱ्या ज्युनियर वर्ल्ड कप क्रिकेट टीममधे संभाव्य २५ खेळाडूंमधे प्रतिष्ठानचे क्रियाशील कार्यकर्ते **हेमंत महादेव यांचा मुलगा सुशांत** यांचा समावेश करण्यात आला आहे. अंतिम संघात सुशांतची निवड होवो अशा सर्व कुलबांधवांच्या शुभेच्छा.

**सुवर्णपदक विजेती ऋचा**

प्रतिष्ठानचे सभासद, कुलवृत्तान्ताच्या दुसऱ्या आवृत्तीचे सहसंपादक **माधव नारायण यांची नात ऋचा** (मिलिंद माधव पृ.३३१ यांची मुलगी) सध्या मुलुंडच्या वझे कॉलेजात प्रथम वर्ष कॉमर्समधे शिकत आहे. नोव्हेंबर २००३ मधे अमरावती विद्यापीठातर्फे आयोजित केलेल्या ७व्या महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ क्रीडास्पर्धा-अश्वमेध २००३ मधे सुवर्णपदक विजेत्या मुंबई विद्यापीठाच्या महिला बास्केटबॉल संघातून तिने सुवर्णपदक मिळवले.

तत्पूर्वी नोव्हेंबर २००३ मधे वेल्लोर (तामिळनाडू) येथे झालेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ बास्केटबॉल स्पर्धेतहि ती मुंबई विद्यापीठ (महिला) संघातून खेळली.

तसेच ऑक्टोबर २००३ मधे वझे कॉलेज बास्केटबॉलसंघातून खेळताना तिने मुंबई विद्यापीठ आंतरमहाविद्यालयीन महिला बास्केटबॉल स्पर्धेत सुवर्णपदक मिळवले होते.

चि. ऋचा ६व्या इयत्तेत शिकत असतांनापासून बास्केटबॉल स्पर्धा गाजवत आहे. तिने तिच्या क्लबचा संघ, ठाणे जिल्हयाचा संघ यांचे कप्तानपदहि भूषविले आहे. अनेक स्पर्धांत सर्वोत्कृष्ट महिला बास्केटबॉल खेळाडू म्हणूनहि मान मिळविला आहे.

सर्व मराठे परिवारातर्फे चि. ऋचाला भावी यशाबद्दल शुभेच्छा.

**सहस्त्रचंद्रदर्शनी दत्तोपंत**

प्रतिष्ठानचे एक क्रियाशील ज्येष्ठ कार्यकर्ते **दत्तात्रय आत्माराम** (पृ.३३६) मुलुंड, मुंबई यांनी ११.४.२००३ रोजी ८० व्या वर्षांत पदार्पण केलें (जन्म ११.४.१९२४) यानिमित्त त्यांच्या मुलांनी ५ डिसेंबर २००३ रोजी मुलुंड येथील कालिदास कॅफेमधें सहस्त्रचंद्रदर्शन धार्मिक सोहळा आयोजित केला होता. या वेळी त्यांच्या आप्तस्वकीयांबरोबरच ब्रिज व पोहणे या क्षेत्रांतले त्यांचे अनेक मित्र व विद्यार्थी आवर्जून अुपस्थित होते.

सदा हसतमुख असणारे दत्तोपंत आज ८०व्या वर्षीहि नियमितपणे त्यांचे ब्रिज व पोहण्याचे छंद जोपासत आहेत. अनेकांना आवर्जून उत्तेजन देऊन पोहणे शिकवत आहेत. त्यांनी 'शतायु' व्हावे अशी सर्व मराठे कुटुंबीयांतर्फे शुभेच्छा.

**वारकरी दिंडींत वामन शंकर**

ठाण्यांतील ज्ञानदेव सेवा मंडळातर्फे कार्तिकी एकादशीनिमित्त (४.११.०३) ग्रामदैवत असलेल्या कौपिनेश्वर मंदिरापासून एक दिंडी काढण्यात आली होती. **ज्ञानदेव सेवा मंडळाचे वामनराव (वामन शंकर पृ.२७७)**

### *दत्तोपंतांची ओळख*

**- उदय दत्तात्रय** (३३६), मुलुंड, मुंबई

**दत्तोपंतांच्या सहस्त्रदर्शन धार्मिक सोहळ्यात त्यांची ओळख करून देण्यातील नाविन्य मला आवडले. आपणालाहि ते भावेल असे वाटते. -संपादक**

ओळख आजच्या उत्सवमूर्तीची
आयुष्यभर साथ सौ. नीलाची

तात जे प्रतिभा-माधुरीचे
पिता जे उदय-चंद्रशेखरचे

श्वशुर जे किशोर-श्रीकांतचे
सासरे जे ज्योती-वैशालीचे

आजोबा जे रश्मी-अल्पनाचे
तसेच ते शैलजा-स्वातीचे

आजोबा जे बॉबी-मकरंदचे
पणजोबा ते संजना पेंढारकरचे

बंधु जे शरयू-वसंताचे
तसेच विलास-दामोदर-मधुकरचे

मेहुणे जे बापू जोगळेकरांचे
साडू ते रामभाऊ वेलणकरांचे

नाते जडले मित्रत्वाचे
समस्त स्विमर कंपूचे

नाते जडले बापट भागवतांचे
नाते जुळले काळे निमकरांचे

**स्वागत सर्व उपस्थितांचे**
**निमित्त सहस्त्रचंद्रदर्शन सोहळ्याचे**

Marathe Pratishthan

**त्यांची पत्नी शीलाताइ** यांचेसह या दिडींत सहभागी झाले होते. (वामनराव व शीलाताईंना घंटाळी प्रबोधिनी संस्थेतर्फे आदर्श दांपत्य पुरस्कार मिळाल्याचे वाचकांच्या स्मरणात असेलच - पहा हितगुज मार्च २००३).

**चित्पावनी कार्यक्रमात**
**आकाशवाणीवर मराठे कुटुंबीय**

मराठीच्या बोलीभाषांची १३ भागांची एक मालिका आकाशवाणी मुंबई केंद्रावरून नुकतीच प्रसारित करण्यांत आली. यामधें 'चित्पावनी' बोलीवरचा कार्यक्रम ३० मे २००३ रोजी प्रसारित झाला. **याचे लेखन** प्रतिष्ठानचे ढवळी-फोंडा, गोवा येथील क्रियाशील कार्यकर्ते, निवृत्त शिक्षण संचालक **कालिदास बाळकृष्ण** (पृ.५४१) **यांनी केले होते**; आणि **चित्पावनीचे वाचन केले होते हितगुजचे संपादक लक्ष्मण शंकर** (पृ.५२०) **यांनी**. यासाठींचे बाह्य ध्वनिमुद्रण खोतोडे व बिंबल, गोवा येथे करण्यात आले होते. या उत्स्फूर्त नाट्यीकरणांत सर्वश्री लक्ष्मण पांडुरंग, मनोहर शंकर, सीताराम यशवंत, त्यांची पत्नी मनीषा व पुत्र यशवंत, पुरुषोत्तम विष्णू व त्यांचे बंधु संदीप, सौ. राधा देऊ हे कुलबांधव सहभागी झाले होते.

**नांदा सौख्य भर**

बिंबल, गोवा येथील हितगुज वर्गणीदार **देऊ रामचंद्र (पृ.५१५) यांची मुलगी गंगा ऊर्फ दर्शना** हिचा विवाहसमारंभ आंजर्ले येथील मोहन जोशी यांचे पुत्र प्रसाद (वास्तव्य पुणे) यांचेशी पुण्यात ५ डिसेंबर २००३ रोजी थाटामाटांत साजरा झाला.

**सहवेदना**

१) प्रतिष्ठानचे कार्यकारी मंडळ सदस्य **आनंद यशवंत यांचे चुलतबंधु भास्कर शंकर** (पृ.२७७) यांचे ११.१२.२००३ रोजी वाशी येथे ६३ व्या वर्षी दु:खद निधन झाले. ते स्वत: डॉक्टर होते. ३ डिसेंबरला ते अचानक मेंदूतील रक्तस्त्रावाने कोमामध्ये गेले, आणि त्यांतच त्यांचा अंत झाला.

त्यांची एकुलती एक मुलगी कविता हिने त्यांचे सर्व अंत्यसंस्कारविधी स्वत: करण्याची इच्छा व्यक्त केली आणि त्यांच्या अंतेवासीयांनीहि तिची ही विनंती मान्य करण्याचा प्रागतिक दृष्टिकोन स्वीकारून एक नवा आदर्श निर्माण केला आहे.

२) नाशिकमधील कुलबांधव **दिगंबर दत्तात्रय** (पृ.३६३) यांचे २४ सप्टेंबर २००३ रोजीं वयाच्या ८८ व्या वर्षी दु:खद निधन झाले.

३) प्रतिष्ठानचे कार्यकारी मंडळ सदस्य **प्रभाकर दामोदर (पृ.१२०) यांची आई कृष्णा (मंदाकिनी)** यांचे अल्पशा आजाराने दि. २४.८.२००३ रोजी मुंबईत दु:खद निधन झाले.

४) प्रतिष्ठानच्या पुणे शाखेचे आधारस्तंभ **वामन आत्माराम ऊर्फ आण्णा (पृ.३६६) यांची पत्नी कमल** यांचे १३.१२.२००३ रोजी दु:खद निधन झाले. आण्णांनी (वय ८०) हा आघात मोठ्या धीराने सोसला.

५) प्रतिष्ठानचे मुंबईतील एक क्रियाशील कार्यकर्ते **सदानंद विष्णू ऊर्फ भाऊ मराठे (पृ.५०७) यांची पत्नी वसुंधरा** यांचे दि. १८ डिसेंबर २००३ रोजी दु:खद निधन झाले. त्या गेले ६ महिने कॅन्सरने आजारी होत्या.

**वरील सर्व मृतांच्या कुटुंबीयांच्या दु:खात मराठे परिवार सहभागी आहे.**

***

---

***२१वी वार्षिक सर्वसाधारण सभा***
*(पान १ वरून पुढे चालू)*

व्यक्तीने आजीव सभासद व्हावे अशी सुधारणा केली.

**लक्ष्मण शंकर (पृ.५२०), हितगुज संपादक** यांना काही अपरिहार्य कारणामुळे लवकर घरी जाणे आवश्यक होते. तेव्हा त्याना त्यांच्या **७० व्या वाढदिवसानिमित्त सर्व उपस्थितांनी शुभेच्छा दिल्या.** तसेच प्रतिष्ठानचे **ज्येष्ठ सभासद दत्तात्रय आत्माराम यांनाहि ऐंशीव्या वर्षात पदार्पणाबद्दल शुभेच्छा देऊन** त्यांनी 'सेंच्युरी' गाठावी अशी अपेक्षा व्यक्त केली.

ल. शं. मराठे यानी **हितगुजचा डिसेंबर अंक पुणे अधिवेशनाच्या वृत्तान्तासह काढायचा असल्याने जानेवारीत निघेल** असे सांगून हितगुजला सभासदांची विशेष माहिती, व्यक्ती परिचय वगैरे साहित्य देण्याचे आवाहन केले.

**हेमंत महादेव** यानी निधी संकलनाचे लक्ष्य ठरवावे अशी सूचना केली. तसेच प्रतिष्ठानच्या निधींची माहिती सभासदांना वेळोवेळी द्यावी अशीहि सूचना केली.

अध्यक्षांनी वैद्यकीय निधीचे लक्ष्य रुपये एक लाख असावे असा प्रस्ताव लगेच पुढे ठेवला. सभेने टाळ्यांच्या गजरात त्याला संमती दिली. सभास्थानी अकरा हजार रुपयांच्या देणग्यांची आश्वासने सभेला मिळाली.

पुढील वर्षाकरिता मे. मराठे आणि असोसिएटस यांची मराठे प्रतिष्ठानचे हिशेब तपासनीस म्हणून नेमणूक करण्यात आली व त्यांचे मानधन रु. ७५० ठरविण्यात आले.

त्यानंतर प्रतिष्ठानच्या सभासद व हितचिंतक **सौ. मंगला प्रवीण** (पृ.३६१) **यांनी कुटुंब सल्ला केंद्राबाबत आपले विचार मांडले.** ९० टक्के घटस्फोट वेळेवर योग्य तो सल्ला न मिळाल्यामुळे होतात. कोणत्याही समस्येचे मूळ अतिशय खोल असते. समस्येच्या मुळाशी जाऊन तिचे निवारण करणे समाजस्वास्थ्याच्या दृष्टीने जरूरीचे आहे. प्रतिष्ठानने पुढाकार घेऊन अशी सल्लाकेंद्रे स्थापावी असेहि त्यांनी सुचवले.

**वि. के. मराठे** यांनी सांगितले की तरुणांना त्यांच्या योग्यतेप्रमाणे सोडाच पण सामान्य नोकऱ्या सुध्दा मिळत नाहीत; ते उत्साह, उमेद हरवून बसतात. त्यांच्या या मनस्थितीचे पर्यवसान आक्रमक व हिंसक स्वरूपात होऊ नये म्हणून या वर्गाकरिताहि सल्लाकेंद्रे असणे आवश्यक आहे. तसेच ज्येष्ठ व्यक्तींच्यासुध्दा समस्या असतात. आता VRS च्या जमान्यांत अवेळी नोकरी गमावून घरी बसावे लागते. पैसा पदरी असला तरी प्रश्न सुटत नाहीत. तेव्हां त्या दृष्टीनेसुध्दां विचार होणे आवश्यक आहे.

एक तरुण सभासद **रविंद्र दिनकर**, मालाड, यांनी **सभेपुढे स्वानुभवाचे किस्से सांगितले.** कृतिवीर रवींद्र म्हणाले की प्रतिष्ठानने पुढे होऊन विधायक कार्य करावे. तरुण कुलबांधवांच्या समस्या जाणून घेऊन शक्य ती मदत करावी. चार प्रेमाच्या शब्दांचे निराश झालेले तरुण भुकेले असतात. मी एवढा व्याप वाढवीन अशी माझ्या कुटुंबातल्या एकाही

Marathe Pratishthan

# मराठे प्रतिष्ठान गुणवत्ता पारितोषिकें २००२-२००३

## अ. माध्यमिक शालांत परीक्षा (१०वी)

| नाव/(पृ.क्र.), गाव | गुण(%) | रक्कम (रु.) |
|---|---|---|
| १. **सुकृत विनायक खांबेटे** (६९४), विलेपार्ले, मुंबई विभाग गुणवत्ता यादीत ५वा | ९४.२७ | ५०० +२५०★ |
| २. **मृणाल मिलिंद सरवटे** (७३०), ठाणे (वामन नारायण चक्रदेव यांची नात) | ९२.०० | ३५० |
| ३. **अनुश्री अविनाश मराठे** (४४०), ठाणे इ. ६ व ९ मधे होमी भाभा बालवैज्ञानिक रौप्यपदक | ९१.३३ | ३५० |
| ४. **सौरभ प्रफुल्ल चक्रदेव** (७३७), पुणे महाराष्ट्र गणित अध्यापक महामंडळाच्या गणित पारंगत परीक्षेत प्रथम क्रमांक | ८९.६० | ३०० |
| ५. **गौरी हेमंत परांजपे** (७३०), विलेपार्ले (वामन नारायण यांची नात) | ८८.१३ | ३०० |
| ६. **केतकी जयंत** (२३८), कर्जत | ८८.०० | ३०० |
| ७. **मनोज मधुकर** (५३८), सांखळी, गोवा सांखळी केंद्रात १ला | ८६.५३ | ३०० |
| ८. **स्वराली सतीश** (५५३), पुणे | ८६.१३ | ३०० |
| ९. **स्नेहा उदय** (४०५), आडेली मालवण केंद्रात ८वा क्रमांक | ८५.८७ | ३०० |
| १०. **स्वप्निल सुधीर चितळे** (३७४), **बोरिवली** (दत्तात्रय गणेश यांचा नातू) | ८२.५३ | २५० |
| ११. **नीरज हेमंत** (३८५), वडोदरा | ८५.०० | ३०० |
| १२. **शारदा आनंद** (११५), गोवा | ८०.५३ | २५० |
| १३. **अदिती श्रीपाद** (८७), डोंबिवली | ७२.६७ | १५० |
| १४. **मृणाल अनिल** (१५६), बदलापूर | ७१.६० | १५० |

## ब. उच्च माध्यमिक शालांत परीक्षा (१२वी)

| नाव/(पृ.क्र.), गाव | गुण(%) | रक्कम (रु.) |
|---|---|---|
| १. **हर्षद प्रसाद आठवले** (कॉ) (८७), बोरीवली (सदाशिव गोविंद यांचा नातू) मुंबई विभागात कॉमर्समधे गुणवत्ता यादीत ११वा | ८७.०० | ५०० +२५०★ |
| २. **दिवाकर शिवानंद** (कॉम्प्यु-टेकनीक), गोवा | ८२.५० | ३०० |
| ३. **अश्विनी मिलिंद चक्रदेव** (कॉ) (७३७), पुणे | ७९.६७ | ३५० |
| ४. **तन्मय अजित चक्रदेव** (सा) (७३७), पुणे | ७९.३३ | ३०० |
| ५. **केतकी अरुण कुळकर्णी** (कॉ) (४२७), कोल्हापूर (भालचंद्र कृष्ण यांची नात) | ६५.५० | २०० |
| ६. **सुशांत हेमंत** (कॉ) (४७१), विलेपार्ले | ६५.५० | २०० |
| ७. **देवयानी श्रीपाद** (कॉ) (८७), डोंबिवली | ६७.०० | २०० |
| ८. **ज्योत्स्ना बाळकृष्ण** (आ), (५०५), तुळस | ७२.६७ | ३०० |

**कॉ** - कॉमर्स, **सा** - सायन्स, **आ** - आर्ट्स्

## क. पदवी - उच्च पदवी - अत्युच्च पदवी परीक्षा

| नाव/(पृ.क्र.), गाव | गुण(%) | रक्कम (रु.) |
|---|---|---|
| १. **श्रुती सुधाकर** (९०), बोरीवली B.Sc | ८०.३८ | ३५० |
| २. **केतकी अनंत** (४००), अंधेरी B.H.Sc | ६४.५४ सेमेस्टर ५ व ६ | ३५० |
| ३. **राहुल सुरेश** (२७९), पुणे M.Sc पुणे विद्यापीठात ३रा, १ल्या तीन सेमेस्टरमधे १ला आल्याबद्दल रु. २१०० चे बक्षीस. बंगलोरच्या रामन रिसर्च इन्स्टिट्यूटमधे पी.एच.डी. साठी ५ वर्षासाठी फेलोशिप | ६८.०० | ५०० |
| ४. **मंदार मधुसूदन विद्वांस** (६३७), कल्याण MSc | ६४.८० | ३५० |
| ५. **गौतम श्रीकांत** (३७८), अंधेरी CA | ५५.८७ | ५०० |
| ६. **निलेश रमेश जोशी** (४००), जोगेश्वरी CA (यशवंत लक्ष्मण यांचा नातू) | ५१.०० | ५०० |

## ड. अन्य परीक्षा

| नाव/(पृ.क्र.), गाव | गुण(%) | रक्कम (रु.) |
|---|---|---|
| १. **कौस्तुभ अनंत** (८७), घाटकोपर पूर्व माध्यमिक शिष्य. (इ. ४थी) | ९४.६० | १५० +२५०★ |
| २. **प्रीता संजय करमरकर** (५२०), बदलापूर (लक्ष्मण शंकर यांची नात) माध्यमिक शिष्य. (इ. ७वी) | ८३.०० | १५० +२५०★ |

★ कै. कुमारी अनिता खांबेटे स्मृति पारितोषिक - १०वी, १२वी, पूर्व-माध्यमिक-शिष्य. आणि माध्यमिक शिष्य. परीक्षेत मराठे कुलबांधवांत सर्वाधिक गुण.

माणसाची कल्पना नव्हती. मी मेडिकल रिप्रेझन्टेटिव्ह म्हणून सुरवात केली पण तिथेच थांबलो नाही. मला MBA व्हायचे होते. पाठबळ नव्हते. पाठिंबा नव्हता. पैसा तर मुळीच नव्हता. आपण एकाच कुटुंबातले आहोत म्हणून सांगतो, आईच्या गळ्यातले मंगळसूत्र विकून मी MBA ची फी भरली. (रविंद्र यावेळी फारच हळवा झाला होता.) पण जिवाचं रान करून मी MBA झालो. त्या क्षणी मी ठरवले की नुसता स्वत: पैसा मिळवायचा नाही. माझ्यासारख्या भन्नाट, परिस्थितीशी झुंज देणाऱ्या तरुणांना द्रव्य देणारी विद्या शिकवायची, त्यांचे जीवन फुलवण्याचा प्रयत्न करायचा.

आज माझी स्वत:ची कंपनी आहे. व्यवसायक्षेत्रात दिग्गज व्यक्तींशी परिचय आहे. एकेकाळी उनाड ठरलेला दिशाहीन मी आज अपेक्षापूर्तीचा आनंद उपभोगीत आहे.

मराठी ज्येष्ठ बांधवांकडे पैसा नसतो. गृहिणींना पैसा संपादन करण्याचे मार्गच ठाऊक नसतात. आपले संसार संभाळून आपण संसारात पैशाची भर घालू शकू अशा योजना माझ्याकडे आहेत. तरुणांनी निराश होऊ नये. मला भेटावे मी त्यांना निश्चित चांगला मार्ग दाखवीन नुसती आश्वासने देणार नाही. मला २८८२८१०९ वा ९५२५०-२५०७७५३ या दूरध्वनीवर संपर्क साधून भेटावे.

त्यानंतर **वृध्द सेवा मंडळाचे माजी**

Marathe Pratishthan

# वार्षिक सर्वसाधारण सभा ७.१२.२००३



भाषण करताना सौ. मंगला प्रवीण आणि रविंद्र दिनकर





वरील फोटो - कार्यवाह वि. के., अध्यक्ष अरविंदराव, कोषाध्यक्ष सी. गो. खांबेटे आणि हितगुज संपादक लक्ष्मण शंकर

खालील फोटो - गुणवंत विद्यार्थ्यांसमवेत दत्तात्रय आत्माराम (डावीकडून ५वे)

**अध्यक्ष व धडाडीचे कार्यकर्ते दिनकरराव मराठे** (रविंद्र यांचे वडील नव्हे) यानी सांगितले की तरुण एकलकोंडा बनणे हे अत्यंत घातक गोष्ट आहे. त्याला आर्थिक मदत, व्यवसायविषयक मार्गदर्शन हवेच; पण खरी जरूरी आहे त्याच्याशी प्रेमाचे चार शब्द बोलण्याची.

त्यानंतर अध्यक्षांनी **समारोपाच्या भाषणात** सांगितले की प्रतिष्ठानचे साडेबाराशे सभासद असताना या सभेला इतकी कमी उपस्थिती ही गोष्ट खेदजनक आहे. वार्षिक अहवालामध्ये बऱ्याच प्रिंटिंग मिस्टेक्स आहेत. याबद्दल मी कोणतेही कारण न देता आपली जाहीर क्षमा मागतो आणि अशा उणीवा भविष्यात दिसणार नाहीत असे आश्वासन देतो.

प्रतिष्ठानच्या कार्यात तरुणांचा सहभाग नगण्य असावा ही गोष्ट त्यांच्याइतकीच ज्येष्ठांसाठीसुध्दां विचार करण्यासारखी आहे. उद्योग-व्यवसायात उभे राहून तरुणांनी यशस्वी जीवन जगावे हे कै. सुरेशभाऊंचे एक स्वप्न होते. ते स्वप्न प्रत्यक्षात उतरविण्यासाठी आपण प्रयत्नांची पराकाष्ठा केली पाहिजे. माझ्यापुरते बोलायचे तर बॅन्केविषयी कोणतीही मदत मी जरूर करीन. आपले कुलबंधू सतीशभाऊ मराठे हे सुध्दां या संदर्भात आपणाला जरूर मदत करतील.

आपण सर्व कामे बाजूला ठेवून सभेकरता आलात याबद्दल माझ्यातर्फे व कार्यकारी मंडळातर्फे मी आपला अत्यंत ऋणी आहे. डिसेंबर २२ ते २४ ला भरणाऱ्या अधिवेशनाला आपण आपल्या कुटुंबियांसह पुणे मुक्कामी जरूर यावे.

प्रतिष्ठानचे तरुण कार्यकर्ते पुष्कराज वामन मराठे यानी उपस्थितांतर्फे कार्यकारी मंडळाचे आभार मानले.

सभेला उपस्थित राहिलेले काही तरुण रविंद्र मराठे यांच्या आश्वासनात्मक भाषणामुळे उत्साहित झाले होते. त्यानी रविंद्रकडे सभा संपल्याबरोबर धांव घेतली. ***

# गोमंतक मराठे परिवार संमेलन (२२ व २३ नोव्हेंबर २००३)

- **सौ. शुभदा दीपक** (पृ.५३३), शिरोडा - गोवा.

मराठे परिवार - गोमंतक संमेलन, श्रीवामनेश्वर देवस्थान सभागृह, ढवळी, फोंडा - गोवा, येथे दि. २२ व २३ नोव्हेंबर रोजी संपन्न झाले. हे दुसरे संमेलन होते.

दि. २२ नोव्हेंबर २००३, संध्याकाळी सहा वाजल्यापासून कुलबांधवांनी आपली उपस्थिती लावण्यास प्रारंभ केला. ठीक सात वाजता परस्पर परिचय कार्यक्रमाला सुरवात झाली. रात्री नऊ वाजेपर्यंत हा कार्यक्रम चालू होता. यात दोघा-दोघांची जोडी एक दुसऱ्याचा परिचय करून देत होती. त्यात एकमेकांच्या आवडी, सवयी, जीवनातील एखादा मजेदार प्रसंग, शिक्षण, व्यवसाय इ. बाबी येत. त्यामुळे कार्यक्रम खूप छान रंगला.

रात्री साधे पण रुचकर असे जेवण सर्वांनी गप्पा गोष्टी करीत हास्यविनोदात घेतले व त्यानंतर लगेच सांस्कृतिक कार्यक्रमाला सुरवात झाली. यात छोट्यांनी उत्फूर्ततेने सहभाग दिला. प्रथम **सौ. सुनिती अशोक** यांनी एक विज्ञानकथा सांगितली. **कु. अपर्णा विश्वनाथ** हिने गोड आवाजात भक्तीगीत गायिले. तसेच ''मानवताधर्म म्हणजे काय?'' यावर फारच छान, ओघवत्या भाषेत, संस्कृत सुभाषिते, सुविचार, स्पष्टोच्चारानी परिपूर्ण असे भाषण केले. **चि. आभाने** छोटीशीच पण छान अशी गोष्ट सांगितली. **चि. अतुल, चि. अमोघ** यांनी विनोदी चुटके सांगून सर्वांना हसविले. **श्री. प्रदीप अनंत** यांनी नाटकातील डायलॉग व नाट्यगीत गाऊन दाखविले. **श्री. प्रसादने** नाटकातील स्वगत - उघड अभिनयासहित केले. अशा प्रकारे या

Marathe Pratishthan

दिवसाच्या कार्यक्रमाची सांगता झाली.

दि. २३ नोव्हेंबर रोजी सकाळी ठीक १०.०० वाजता संमेलनाला सुरवात झाली. सर्वांनी उभे राहून ''या कुन्देन्दु तुषार हार धवला'' ही प्रार्थना म्हणून वातावरण निर्मिती झाली. नंतर या वर्षातील दिवंगत कुलबांधवांना श्रद्धांजली अर्पित करण्यात आली. **प्रमुख पाहुण्या डॉ. सौ. वसुधा भिडे** व त्यांचे यजमान तसेच संमेलनाध्यक्ष माजी आमदार श्री. सदाशिव वामन यांना सौ. अपूर्वा अरूण यांनी आसन ग्रहण करण्याची विनंती केली.

**कु. अपर्णा विश्वनाथने** प्रमुख पाहुणे, अध्यक्ष उपस्थित कुलबांधव व निमंत्रितांचे स्वागत केले.

**सौ. अपूर्वा अरूण** यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. तद्नंतर एक पुष्प व पुस्तक प्रदान करून **पुष्पसारस्वताने पाहुण्यांचे स्वागत चि. अपर्णा, आभा व अमोघ** यांनी केले. प्रमुख पाहुण्या डॉ. सौ. वसुधा भिडे यांच्या शुभहस्ते दीपप्रज्वलन झाले व रीतसर कार्यक्रमाला सुरवात झाली.

प्रमुख पाहुण्या **डॉ. सौ. वसुधा भिडे** यांना निमंत्रित करण्याचा मुख्य उद्देश होता, त्यांनी केलेली 'भाषाशास्त्र' या विषयावरील पी.एच.डी. व त्यात बोलीभाषा 'चित्पावनी' हा लिहिलेला अभ्यासपूर्ण प्रबंध. ही चित्पावनी भाषा गोमंतकातील जास्तीत जास्त चित्पावन ब्राह्मण कुटुंबात बोलली जाते. म्हणूनच मराठे परिवाराव्यतिरिक्त इतर चित्पावन ब्राह्मणांनाही संमेलनाला निमंत्रित केले होते. **डॉ. सौ. वसुधा भिडे** यांनी आपल्या भाषणात, आपली मातृभाषा चित्पावनी नसूनसुद्धा आपण विशेष प्रयत्न करून या भाषेवर कशी डॉक्टरेट मिळविली याचे आलेल्या कडू-गोड अनुभवांसहित सविस्तर कथन केले. तसेच या भाषेतील काही संवाद, गाणीही त्यांनी गाऊन दाखविली. ती ऐकताना आम्ही आमच्याच घरी असल्याचा क्षणभर भास झाला.

त्यांनी असेही सांगितले की, इ.स. १९८३ साली आपण या विषयावर डॉक्टरेट केली. पण पुणे किंवा मुंबई, कोकण कुठल्याही बांधवांनी या गोष्टीची दखल घेतली नाही. मात्र आज वीस वर्षानंतर गोमंतकातील मराठे बांधवांनी या ठिकाणी बोलवून आपली दखल घेतली, याचे आपल्याला खूप अप्रूप वाटले. त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली.

प्रमुख पाहुण्या डॉ. सौ. वसुधा भिडे यांना अध्यक्षांच्या हस्ते शाल व श्रीफळ देऊन गौरविण्यात आले.

मध्यंतराच्या चहापानानंतर **श्री. सदाशिव वामन यांच्या अध्यक्षतेखाली परिवाराशी संबंधित विषयावर चर्चासत्र** घेण्यात आले. त्यात विषय होते.



**डावीकडून नीळकंठ मराठे, डॉ. सौ. वसुधा भिडे आणि सदाशिव मराठे**

१) होंडा येथील **वडनाथ देवस्थानातील कुलपुरुषाच्या सेवेसंबंधी** अहवाल व चर्चा. यात **श्री. नीळकंठ मराठे** यांनी मूळ पुरुषाची आठवण म्हणून देवाच्या सेवेत आपला सहभाग असावा. तसेच त्यासाठी पन्नास हजार रुपये कायमस्वरूपी ठेव म्हणून देवस्थानला द्यावी असा विचार मांडला. **श्री. वसंत मराठे** यांनी तीस हजार मराठ्यांची पूजा व वीस हजार 'वार्षिक एखादा उत्सव' असे ठेवण्यास सांगितले. श्री. शशिकांत, श्री. प्रकाश, श्री. सदाशिव, श्री. बाळकृष्ण आदी कुलबांधव या चर्चेत सहभागी झाले.

२) पुणे येथील **अ. भा. मराठे परिवार संमेलन** या विषयावर **श्री. कालिदास बाळकृष्ण** यांनी विचार मांडले. संमेलनाच्या तारखा अडचणीच्या असल्या तरीसुद्धा सर्व गोमंतकीय कुलबांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे त्यांनी आवाहन केले. स्मरणिकेसाठी जाहिरात परिवाराची एकच असावी. माहेरवाशिणींनाही 'हितगुज'चे वर्गणीदार करून घ्यावे. पुढील अ. भा. संमेलन गोमंतकात घ्यावे का? किंवा ते गोमंतकीयांनी गुहागर येथे घ्यावे? परिवारातील विशेष प्रावीण्य मिळविलेल्या बांधवांचे कौतुक सोहळे आयोजित करावे का? किंवा आम्ही सगळे सारखेच म्हणून गप्प बसावे? वरील सर्व विषयावर चर्चा तसेच विचारांची देवाण-घेवाण होणे आवश्यक आहे असे मत त्यांनी मांडले.

३) **कुलवृत्तांत व हितगुज पत्रिकेसंबंधी आपले विचार मांडताना श्री. मोरेश्वर मराठे** यांनी हितगुजशी आपला संबंध वाचक म्हणूनच जास्त आलेला आहे असे प्रतिपादिले. तसेच परिवाराशी संबंधित असलेले विषय चर्चेसाठी 'हितगुज' मध्ये यावेत असे मत व्यक्त केले.

४) आयत्यावेळी येणारे विषय :-

अ) **संमेलनाला उपस्थिती पूर्ण संख्येने व्हावी** या दृष्टीने कोणते उपाय योजावे?

श्री. अजित - व्यवस्थेत कुठेतरी कमी पडलो असू. स्वतःची मानसिकता जागृत होणे आवश्यक.

श्री. नीळकंठ - प्रत्यक्ष सर्वांशी संपर्क साधावा.

श्री. बाळकृष्ण - संमेलन एखादा सण, समारंभ आयोजित करून घ्यावे.

सौ. अपूर्वा - आमचं काही चुकलं का? मनमोकळेपणाने सांगावे.

सौ. शुभदा - हे दुसरेच गोमंतकीय संमेलन आहे. हळूहळू प्रगती होईल.

श्री. अरुण - सर्वांना निमंत्रणे योग्य वेळेत पाठविली होती त्याची कुलबांधवांनी दखल घ्यावी.

ब) श्री प्रसाद - **त्रिपुरारी पौर्णिमा उत्सव** - गुहागर येथे मराठेंनी यजमानपद घेऊन साजरा करावा.

वरील मुद्यांनुसार चर्चा होऊन पुढील संमेलन मोठ्या उत्साहाने व मोठ्या संख्येने उपस्थित राहून संपन्न व्हावे अशी सर्वांनी इच्छा प्रकट केली.

**अध्यक्षीय भाषणात श्री. सदाशिव वामन** यांनी आपली मूळ भाषा चित्पावनी संपर्क माध्यम बनली पाहिजे. शक्य असल्यास त्या



Marathe Pratishthan

भाषेतून शिक्षण देणारी शाळा सुरू करावी. आपले सर्वतोपरी साहाय्य असेल. **या शाळेसाठी व मराठे परिवार भवन बांधण्यासाठी आपली जमीन विनामूल्य देण्याचे त्यांनी जाहीर केले.**

गोमंतकातील कुलबांधवांच्या घरी स्वत: जाऊन भेट देण्याचा मनोदयही त्यांनी व्यक्त केला. तसेच सर्व समाजातील लोकांशी चांगले वागून आपले अस्तित्व व श्रेष्ठत्व कायम राखण्याचे आवाहन करून त्यांनी आपल्या भाषणाला पूर्णविराम दिला.

तत्पूर्वी कुलबांधवांना येणाऱ्या अडचणी हितगुज मुखपत्राच्या माध्यमातून मांडाव्या असे त्यांनी सुचविले.

शेवटी **आभारप्रदर्शन कु. तृप्ती शशिकांत** हिने केले व भोजनानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

वरील संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. शुभदा दीपक यांनी केले. ***

# मराठे प्रतिष्ठान गुणवत्ता पारितोषिकें २००१-२००२

## अ. माध्यमिक शालांत परीक्षा (१०वी)

| नाव/(पृ.क्र.), गाव | गुण(%) | रक्कम (रु.) | नाव/(पृ.क्र.), गाव | गुण(%) | रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|---|
| १. प्रसाद विजय (३६), पुणे | ८८.५३ | ३०० | ४. श्रीपाद पुरुषोत्तम खांबेटे (७०४) नालासोपारा | ८३.२० | २५० |
| | | + २५०★ | ५. तेजस माधव खांबेटे (७०४) मुंबई | ८०.४० | २५० |
| | | + १००■ | ६. क्षमा रामचंद्र (५३५) मुलुंड | ७५.८७ | २०० |
| २. स्वानंद विश्वास (४०) भायंदर | ८६.४० | ३०० | ७. अनुप अशोक साठे (६७०) बोरिवली | ७४.६७ | १५० |
| ३. सायली सतीश (३८५) बडोदा | ८३.८६ | २५० | ८. अजित अरविंद (८६२) नागपूर | ७०.९३ | १५० |

## ब. माध्यमिक शालांत परीक्षा (१२वी)

| नाव/(पृ.क्र.), गाव | गुण(%) | रक्कम (रु.) | नाव/(पृ.क्र.), गाव | गुण(%) | रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|---|
| १. मेघना उमेश (१३४) मुंबई (सायन्स) | ९१.६७ | ४०० | ७. प्रणव घनश्याम (५२५), बेळगांव (सायन्स) | ७५.६७ | १५० |
| | | २५०★ | ८. आनंद नीळकंठ (५३१) डिचोली, गोवा (सायन्स) | ६७.६७ | १५० |
| २. अवंती श्रीनिवास (३८९) अंधेरी (सायन्स) | ८७.८३ | ३५० | ९. हिमांगी गिरीश (२१८), पवई, मुंबई (सायन्स) | ६६.०० | १५० |
| ३. सुप्रिया राजेंद्र (२९१) ठाणे (सायन्स) | ८७.०० | ३५० | १०. राहुल मोरेश्वर विद्वांस (६६४) लोणावळा (कॉमर्स) | ७९.८३ | ३५० |
| ४. दिलीप सुरेश (२१८) गोवा (सायन्स) | ८५.६७ | ३५० | ११. योगिनी मुरलीधर (२९२) डोंबिवली (कॉमर्स) | ७३.१७ | ३०० |
| ५. श्रद्धा दीपक (५३३) शिरोडा, गोवा (सायन्स) | ७९.३८ | ३०० | १२. प्रमिला शंकर (५०५) तुळस (कॉमर्स) | ७२.६७ | ३०० |
| ६. मकरंद मधुकर (५३८) साखळी, गोवा (सायन्स) | ७८.५० | ३०० | | | |

## क. पदविका, पदवी, उच्च पदवी परीक्षा

| नाव/(पृ.क्र.), गाव | गुण(%) | रक्कम (रु.) | नाव/(पृ.क्र.), गाव | गुण(%) | रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|---|
| १. तेजस शिरीष (२५२), पुणे (Dip Prtg.) | ८०.५५ | ३५० | ८. गंधाली गोविंद (५४१) तिस्क, गोवा BA | ६२.५७ | ३०० |
| २. अमित गोविंद (५४१), तिस्क, गोवा, DME | ६२.२७ | २५० | ९. नरहरी मुकुंद (४०६) तुर्भे BCom | ७३.४३ | ३५० |
| ३. श्रद्धा विजय (९६), पुणे, BE | ७७.७३ | ३५० | १०. राधिका वसंत (९०) पार्ले, मुंबई BCom | ७१.८६ | ३०० |
| ४. नचिकेत श्रीकृष्ण (३१६), पुणे, BE | ७२.२५ | ३५० | ११. शीतल गजानन (१२९) पुणे BCom | ६६.४२ | ३०० |
| ५. तेजस यशवंत (४७५), सांगली, BE | ६५.०० | ३०० | १२. अनघा शरच्चंद्र (४८०) ठाणे BCom | ६२.१४ | ३५० |
| ६. वेदश्री माधव (२०४) मुंबई, BA | ७०.१७ | ३०० | १३. दीप्ती अनंत (४००) अंधेरी BAMS | ६५.२५ | ३५० |
| ७. अनुजा दिलीप (३१४) दादर, मुंबई, BA | ७०.१७ | ३०० | | | |

## ड. अन्य स्पर्धा/परीक्षा

| नाव/(पृ.क्र.), गाव | गुण(%) | रक्कम (रु.) | नाव/(पृ.क्र.), गाव | गुण(%) | रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|---|
| १. महेश्वर माधव (५३४), बेळगांव CA | | ३५० | ३. केतकी जयंत (२३८), कर्जत M.T.S. | | २०० |
| २. स्वप्निल सुधीर चितळे (३७४), बोरिवली, बालवैज्ञानिक | | २५० | | | |

★ १०वी व १२वी मध्ये मराठे परिवारांत सर्वाधिक गुण मिळवल्याबद्दल कै. कुमारी अनिता खांबेटे पारितोषिक.

■ १०वी मध्ये १०० मार्कांच्या हिंदी विषयात मराठे परिवारात सर्वाधिक गुण मिळवल्याबद्दल सौ. सुलभा अनंत प्रायोजित पारितोषिक.

**ती. मातोश्री मंदाकिनी दामोदर**

***यांच्या स्मरणार्थ***

**- श्री. प्रभाकर दामोदर मराठे**, वडाळा, मुंबई.

Marathe Pratishthan

# विवाह सहाय्य

*हितगजच्या वाचकांनो त्यांच्या कटंबातोल अथवा नात्यांतोल किंवा परिचयातोल मला-मलोंचो माहितो 'विवाह सहाय्य' या सदरांत प्रसिद्धीसाठी पाठवावी. बहुसंख्य वाचक हे कपिगोत्रीच असणार. त्यामुळे कपिगोत्र नसणाऱ्या मुलां-मुलींची माहिती पाठविण्यात मराठ्यांच्या माहेरवाशिणी फार मोलाचे कार्य करू शकतील.*

*कुलबांधवांकडून आलेली माहिती खाली दिली आहे. इच्छुकांनी संबंधितांशी परस्पर संपर्क साधावा. - संपादक*

**सौ. नीलांबरी रमेश (पृ.२८०), म. प्र. वधूवर सूचक मंडळ, पुणे यांचेमार्फत आलेली स्थळे ९०/२००३ ते १०५/२००३.**

**क्र. ९०/२००३ वर** - नीलेश प्रभाकर उदास, दे.ब्रा., वय - २९, उंची - ५'-११'', गहू वर्ण, सुदृढ बांधा, मंगळ नाही, M Tech (Madras), दुबईला खाजगी कंपनीमध्ये मुलगा जानेवारीत पुण्यात येणार आहे, जर्मनीला जाऊन आला आहे, आई-वडील व १ विवाहित बहीण आहे. **अपेक्षा** - घरकाम येणारी, पदवीधर व कोणत्याही ब्राह्मण शाखेची चालेल, पत्रिका आवश्यक, **संपर्क** - प्रभाकर एस. उदास, गल्ली नं. ५, फ्लॅट नं. ७, २रा मजला, डहाणूकर कॉलनी, कोथरूड, पुणे - ३८. फोन : ५४४८३८९.

**क्र. ९१/२००३ वर** - वैभव विष्णू आपटे कोब्रा., गोत्र-काशिक, जन्म - २८.१२.१९७६, उंची - ५'-११ १/२'', गोरापान, मध्यम बांधा, रक्तगट - O+ve, व्यंग नाही, चष्मा नाही, मंगळ आहे, BE (Chemical Engg.), MS (USA), नोकरी Detroit अमेरिका, हुद्दा - टेक्निकल को-ऑर्डिनेटर, मा. प्रा. 6000 US$ (रु. ३ लाख), छंद - टेनिस, गायन, अध्यात्मिक वृत्ती, संपूर्ण शाकाहारी व निर्व्यसनी, आई डॉक्टर, वडील BE Civil, भाऊ-भावजय दोघेही डॉक्टर, **अपेक्षा** - पत्रिका आवश्यक, ब्राह्मण पोटशाखेची चालेल, उंची - ५'-४'', वर्ण - गोरा, शिक्षण Physiotherapist किंवा Engineer, चष्मा नको, शाकाहारी, धार्मिक, **संपर्क** - विष्णु बाळकृष्ण आपटे, डी-४, मधुबन अपार्टमेंटस, फर्ग्युसन कॉलेज रोड, पुणे - ४. फोन : ५५३१३२५.

**क्र. ९२/२००३ वर** - स्वानंद गजानन कढे, देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण, गोत्र-गोतम, जन्म - १७.३.१९७५, उंची - ५'-८'', M.Com., DMM, Computer Course, नोकरी - KPCL Hadapsar, Pune, अकौन्टस् ऑफीसर, मा. प्रा. रु. ८५००, वर्ण गोरा, सुदृढ, रक्तगट A+ve, व्यंग नाही, स्वतःचा फ्लॅट आहे, संगीताची आवड व ट्रेकिंग करतो, आई-वडील, १ विवाहित बहीण आहे, वडील सेवानिवृत्त, **अपेक्षा** - उंची - ५'-८'' ते ५'-५'', २४ ते २५ वय, पदवीधर, पुण्यात कायम वास्तव्य व शिक्षिका असावी, मा. प्रा. रु. ४०००-५०००, ब्राह्मण देशस्थ ऋग्वेदी, मुलास अनुरूप असावी, एकत्र राहाण्याची तयारी व देवाधर्माची आवड असावी, चष्मा, बॉबकट, कन्या रास नको, **संपर्क** - गजानन यशवंत कढे, बी ३०५, अलोकनगरी, १३०५ कसबा पेठ, पवळे चौक, सूर्य हॉस्पिटल जवळ, पुणे ११. फोन : ४०१३९०८.

**क्र. ९३/२००३ वर** - मनोज वसंत गयावळ, दे.ब्रा., गोत्र-भारद्वाज, जन्म - २.७.१९७३, उंची - ५'-२'', HSC & Diploma, खाजगी नोकरी, मा. प्रा. रु. ५५००, स्वतःचे नसरापूरला घर व २० एकर शेती आहे, आई-वडील नाहीत, दोन भाऊ व ३ बहिणी विवाहित, **अपेक्षा** - घरकाम येणारी, एकत्र कुटुंबात राहण्याची तयारी असावी, देशस्थ, कोकणस्थ चालेल. **संपर्क** - श्री. मुकुंद वसंत गयावळ, द्वारा यशवंत भिडे, साने गुरुजी नगर, चाळ नं. ६, रूम नं. १०३, अंबीलओढा कॉलनी, एस.पी.च्या मागे. फोन : ४३३२६१९.

**क्र. ९४/२००३ वर** - मंदार वामन आगरकर, कोब्रा, गोत्र-वसिष्ठ, जन्म - १६.६.१९७६, उंची - ५'-५'', B.Com., हॉटेल मॅनेजमेंट डिप्लोमा, लॉजिंग बोर्डीग हॉटेल, जॅम व मध तयार करण्याचा कारखाना, मालक उत्पन्न रु. २००००, गोरा, मध्यम बांधा, व्यंग नाही, चष्मा नाही, मंगळ नाही, गायनाची आवड, पेटी तबला वाजवतो, प्रवास व मित्र जमवणे याची आवड माऊथ आर्गन वाजवतो, पूर्ण वेळ व्यवसाय सांभाळतो, आई-वडील, मोठी बहीण विवाहित पुणे येथे, **अपेक्षा** - कोकणस्थ व मुलाला अनुरूप असावी, एकत्र कुटुंबातली व घरचा व्यवसाय असल्यास प्राधान्य, **संपर्क** - सौ. मधुरा टापरे (बहीण) २३/३७ जयलक्ष्मी बिल्डींग, प्रॉस्पेरिटी सोसायटी, कर्वेनगर, पुणे ५२. फोन : ५४२११९८.

**क्र. ९५/२००३ वर** - अमित अरविंद खरे, को.ब्रा., गोत्र-कौशिक, जन्म -

---

## *गिर्यारोहण - सर्वांनी जोपासावा असा छंद*

गिर्यारोहण अर्थात ट्रेकींग हे एक प्रकारे सर्व वयोगटांतील लोकांसाठी निरोगी रहाण्यासाठीचे टॉनिक आहे. कोणत्याही वयोगटातील व्यक्तीने हा छंद जोपासून निसर्गाचा जास्तीत जास्त आस्वाद घ्यावा व त्याचबरोबर इतिहासाचे ज्ञानही वाढवावे असे मला वाटते.

मी स्वतः हा छंद गेली १५ वर्षे जोपासत आहे. आपणापैकी कोणास हा छंद जोपासायचा असेल तर अवश्य संपर्क करावा. दूरध्वनी क्र. ९५२५०-२४३३०३८, मोबाईल ०९८२२८४७१२०

**- हेमंत अरुण** (पृ.२१), नालासोपारा, जि. ठाणे.

Marathe Pratishthan

१३.१.१९७७, उंची - ५'-८'', BE (Electronics & Tele Communication), नोकरी - अमेरिका (Southwestern Bell Services St. Louis) MO-63043, Post - Senior Software Analyst, मा. प्रा. 500 USS (USA), रक्तगट - O+ve, गहूवर्ण, मध्यम बांधा, चष्मा व लेन्स दोन्ही वापरतो, सगळ्यात मिळून मिसळून राहणे आवडते, ट्रेकिंग व Indoor-Ourdoor खेळाची आवड, पोहणे-गाण्याची आवड, मे व जून २००४ मध्ये भारतात येणार आहे, १ मोठा भाऊ विवाहित सिंगापूर येथे, एक मोठी बहीण विवाहित पुण्याला, आई गृहिणी, वडीलांचे स्वत:चे दुकान, **अपेक्षा** - उंची - ५'-३'' ते ५'-६'', गोरी, स्मार्ट, संसार सांभाळून करीयर करणारी, मनमिळावू, शक्यतो सॉफ्टवेअर आर्किटेक्ट फिजियो थेरपीस्ट असावी, ५ वर्षे परदेशी राहाण्याची तयारी असावी, मंगळ नको, ब्राह्मण कोणत्याही शाखेची चालेल, वडील माणसाचा मान राखणारी व जुन्या-नव्याचा मेळ घालणारी असावी **संपर्क** - अरविंद विनायक खरे, २०२ शनिवार पेठ, पोलीस चौकीजवळ, अक्षय नर्सिंग होमच्या वर, पुणे ४११०३०, फोन : (घर) ४४५३७९०, (दुकान) ४४५८४९२.

**क्र. ९६/२००३ वर** - पुष्कर मोहन पानसे, देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण, गोत्र-मुद्गल, जन्म - २१.४.१९७८, उंची - ५'-११'', कन्या रास, आद्य नाडी, M Tech, आय फ्लेक्स सोल्युशन (सॉफ्टवेअर कंपनी), हुद्दा Consultant. मा. प्रा. रु. ३५०००, गोरा, सुदृढ, व्यंग नाही, सध्या सिंगापूर येथे एप्रिलमध्ये येणार आहे, आई-वडील, एक बहीण अविवाहित, पत्रिका पाहावयाची आहे. **अपेक्षा** - शक्यतो इंजिनियर, **संपर्क** - श्री. मोहन गजानन पानसे, ६८६ बुधवार पेठ, शिवगंगा चेंबर्स, प्रभात टॉकीजजवळ, पुणे ४११००२. फोन : ४४५५१४२.

**क्र. ९७/२००३ वर** - धनंजय दिगंबर जोशी, देशस्थ यजुर्वेदी, गोत्र-काश्यप, जन्म - १६.१०.१९७१, उंची - ५'-४'', गोरा, मध्यम बांधा, चष्मा नाही, मंडळ नाही, रक्तगट - B+ve, नोकरी व वडिलोपार्जित व्यवसाय, मा. प्रा. रु. ४००००, स्वत:चा बंगला, शेती, गाडी, पत्रिका पाहाणे आहे, आई वडील आहेत, भाऊ नाही, १ बहीण विवाहित व २ अविवाहित, **अपेक्षा** - ग्रॅज्युएट, गोरी, ५-८ वर्षे अंतर, उंची - ५'-२'', नोकरी हवी, **संपर्क** - श्री. दिगंबर नारायण जोशी, द्वारा स्वामी समर्थ एजन्सीज, गाळा क्र. ४८, मार्केटयार्ड, अहमदनगर ४१४००१, फोन : २४५१९४५/ २३५६७२० बहीण सुनेत्रा सुभाष देशपांडे, फोन : ४३५०२२०.

### तरुण न येण्याचे कारण !

तरुणवर्ग संमेलनाला न येण्याचे एक गमतीदार कारण ऐकायला मिळाले - ''अहो, इथे येणाऱ्या सगळ्या सगोत्र बहिणी आणि भाऊ. कसा इंटरेस्ट वाटणार मुलांना ?''

हे थोडेसे खरे असले तरी माहेरवाशिणींच्या सासरची म्हणजे परगोत्रातलीहि मंडळी होतीच की संमेलनात!

**- सौ. राधा श्रीकांत** (पृ. ३७८) अंधेरी, मुंबई

**क्र. ९८/२००३ वर** - सचिन प्रभाकर विद्वांस, को.ब्रा., गोत्र-कपी, जन्म - ३०.११.१९७०, उंची - ५'-६'', सावळा वर्ण, शिक्षण १२वी, खाजगी कंपनीमधे नोकरी, मा. प्रा. अंदाजे ६ हजार, स्वत:ची गाडी व मोटर सायकल आहे, बास्केटबॉल खेळतो, **संपर्क** - श्री. प्रभाकर जगन्नाथ विद्वांस, पर्वती निवास, इंडियन जिमखान्यासमोर, माटुंगा, मुंबई ४०००१९. फोन : २४०१२७०६.

**क्र. ९९/२००३ वर** - मंदार अरविंद मराठे, को.ब्रा., गोत्र-कपि, जन्म - २८.११.१९७३, उंची - ५'-७'', वर्ण निमगोरा, बांधा - सुदृढ प्रमाणबद्ध, चष्मा नाही, मंगळ नाही, रक्तगट - A+ve, शिक्षण - डिप्लोमा इन ऑटोमोबाईल इंजिनिअरींग, नोकरी - ऑटोमोटिव्ह मॅन्युफॅक्चर्स (अशोक लेलंड) कुर्ला येथे, हुद्दा - सिनियर सर्व्हिस इंजिनिअर, मा. प्रा. रु. १२०००, मुलाला आई-वडील व १ विवाहित बहीण आहे, **अपेक्षा** - मुलगी पदवीधर असावी, उंची - ५'+, नोकरी करणारी, कोणत्याही ब्राह्मण पोटशाखेची, गोरीच हवी असे नाही, **संपर्क** - श्री. अरविंद रामचंद्र मराठे, २ वाडीलाल निवास, बैल बाजार, काळे मार्ग, कुर्ला (प.), मुंबई ४०००७०. फोन : २५०३२१०१.

**क्र. १००/२००३ वर** - चंद्रशेखर श्रीकृष्ण पाटणकर, को.ब्रा., गोत्र-शांडिल्य, जन्म - ६.८.१९६४, उंची - ५'-५'', मंगळ नाही, शिक्षण - १०वी पास, शिवणाचा कोर्स, शिवणकामाचे स्वत:चे दुकान, मा. प्रा. रु. ४०००, वर्ण सावळा, मध्यम बांधा, चष्मा नाही, निर्व्यसनी, आई आहे, वडील नाहीत, २ विवाहित बहिणी, भाऊ नाही. मुलावर कोणतीही जबाबदारी नाही, **अपेक्षा** - कोणत्याही ब्राह्मण पोटशाखेतील चालेल, शिक्षण १०वी पास, गृहकृत्यदक्ष, व्यवसायाला मदत करणारी चालेल, **संपर्क** - श्री. चंद्रशेखर श्रीकृष्ण पाटणकर, प्रारब्ध बिल्डींग, गुजरात कॉलनी, कोथरूड, पुणे - ४११०३८. फोन : २५३९३६८८.

**क्र. १०१/२००३ वधू** - अनघा प्रदीप मोडक, को.ब्रा., गोत्र-वासिष्ठ, जन्म - २६.७.१९७८, उंची - ५'-३'', शिक्षण - एम.कॉम. कॉम्प्युटर बेसिक, नोकरी डाटा एन्ट्री जॉब वर्क करून देते, रक्तगट - ABRH+ve, वर्ण गोरा, सुदृढ, मंगळ नाही, व्यंग नाही, चष्मा नाही, आई-वडील आहेत, वडिलांचे स्वत:चे वर्कशॉप, १ विवाहित मोठी बहीण, **अपेक्षा** - कोकणस्थ, उच्चशिक्षित, मासिक उत्पन्न १० हजार ते १२ हजार, **संपर्क** - श्री. प्रदीप भालचंद्र मोडक, अश्विनी सोसायटी, ब्लॉक नं. २, स्टेशन रोड, कोल्हापूर ४१६००१, फोन : (०२३१) २६५२८८१.

**क्र. १०२/२००३ वधू** - आरती मोहन पानसे, देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण, गोत्र-मुद्गल, वय २१ पूर्ण, उंची - ५'-३'', शिक्षण BCom., नोकरी नाही, वर्ण गोरा, सडपातळ बांधा, व्यंग नाही, चष्मा नाही, मंगळ नाही, आई-वडील व १ भाऊ आहे, **अपेक्षा** - आई-वडील असलेला व निर्व्यसनी असावा, पत्रिका पाहणे आहे, शक्यतो पुण्यातील व चांगल्या पगाराची नोकरी, **संपर्क** - श्री. मोहन गजानन पानसे, ६८६ बुधवार पेठ, शिवगंगा चेंबर्स, प्रभात टॉकीजजवळ, पुणे ४११००२.फोन : ४४५५१४२.

Marathe Pratishthan

**क्र. १०३/२००३ वधू** - रोहिणी रमेश परांजपे, को.ब्रा., गोत्र-विष्णुवृद्ध, जन्म - २५.५.१९७८, उंची - ५'-४'', एम.कॉम व कॉम्प्युटर कोर्स, खाजगी नोकरी, मा. प्रा. रु. ३०००, रक्तगट - ORH+ve, **गहूवर्णी**, मध्यम बांधा, व्यंग नाही, चष्मा नाही, रांगोळी काढणे, शिवणकाम आणि चित्रपट संगीत ऐकण्याची आवड, आई-वडील भाटघर येथे असतात, मुलगी नोकरीमुळे आतेबहिणीकडे राहाते, भाऊ बहीण नाहीत, वडील निवृत्त, **अपेक्षा** - उंची - ५'-७'' च्या पुढे व वयात २ ते ५ वर्षे अंतर, कोकणस्थ ब्राह्मण पोस्ट ग्रॅज्युएट, पगार ८ ते १० हजार, **संपर्क** - श्री. रमेश माधव परांजपे, द्वारा श्री. वसंत मोरेश्वर भिडे, १४०५ शुक्रवार पेठ, पुणे ४११००२.

**क्र. १०४/२००३ वधू** - सविता दिगंबर जोशी, देशस्थ यजुर्वेदी, गोत्र-काश्यप, जन्म - १८.१०.१९७३, उंची - ५'-३'', गहूवर्ण, शिक्षण - MSc (स्टॅटिस्टिक्स), DBM Web Master Computer Course, नोकरी खाजगी, मा. प्रा. ४०००, वास्तव्य पुणे, रक्तगट B+ve, चष्मा आहे, मंगळ सौम्य आहे, वडिलांचा व्यवसाय, आई गृहिणी, १ भाऊ अविवाहित व्यावसायिक, १ बहीण विवाहित व १ बहीण शिकत आहे, **अपेक्षा** - देशस्थ यजुर्वेदी ऋग्वेदी शाखा, वयात २ ते ३ अंतर हवे, उच्चशिक्षित, शांत, मनमिळावू, चांगल्या कंपनीत किंवा व्यावसायिक, परंतु परदेशात जाण्याची तयारी, नोंदणी विवाहास प्राधान्य. **संपर्क** - श्री. दिगंबर नारायण जोशी, श्री स्वामी समर्थ एजन्सीज, ४८ मार्केटयार्ड, अहमदनगर, फोन : ३५६७२०, ३५५९४५.

**क्र. १०५/२००३ वधू** - मेघमाला दत्तात्रय रानडे, को.ब्रा., गोत्र-भारद्वाज, जन्म - १.११.१९७९, उंची - ५'-२'', MCom. वास्तव्य वाई, उत्तम खेळाडू आहे, जुळा भाऊ आहे, आई वडील निवृत्त पत्रिका पाहाणे आहे. संपर्क - दत्तात्रय रामचंद्र रानडे, १९३ गंगापुरी, दामले आळी, वाई - ४१२८०३, फोन : (९५२४५७) २३३१०. ***

---

*(कृतज्ञ मी... पान ८ वरून)*

**जोडून घ्यावे** म्हणजे नोकरी करणाऱ्यांना त्यात सहभागी होता येईल.

पुण्यातील एक कुलबांधव श्री. प्रभाकर गणेश मराठे यांनी आधी येऊन नोंदणी करून सुद्धा त्यांना योगासनाचा फायदा झालेल्या काही महत्त्वपूर्ण व्यक्तींचे अनुभव कुलबांधवांसमोर मांडायचे होते. त्याला पुरेसा वेळ त्यांना देता आला नाही याबद्दल मी त्यांची क्षमा मागते. पुण्यातील एखाद्या २६ जानेवारीच्या कार्यक्रमात त्यांचा योगासनावरील कार्यक्रम जरूर आयोजित करीन याची खात्री देते. नोंद करूनही विविध गुणदर्शन सादर करण्याची संधी मिळाली नाही. अशा जर अजून काही व्यक्ती असतील तर क्षमस्व!

काही व्यक्तींना दोन्ही दिवस संधी मिळाली तशी न देता इतर कलाकारांना वाव द्यावा ही सूचनाहि स्वागतार्ह.

विविध गुणदर्शनाच्या कार्यक्रमात मंगळवारी संध्याकाळी सौ. अनिता रघुनाथ मराठे यांचे अतिशय सुंदर सुगम संगीत झाले. त्यांच्या साथीदारांनी, आयत्या वेळेला सांगूनही पुण्यातील एक कुलभगिनी सौ. गौरी मराठे व मुंबईतील माहेरवाशीण श्री. व सौ. कट्टी दांपत्य यांनी, पेटी व तबल्याची साथ करून त्यांच्या गाण्यात रंगत आणली. त्यामुळे त्यांचे आभार मानावे तेवढे थोडेच आहेत.

आणखी एक उल्लेखनीय गोष्ट म्हणजे श्रीमती सुशीला दत्तात्रय मराठे या शरीराने ९१ वर्षाच्या पण मनाने तरुण व उत्साही आजी यांनी कविता वाचन व नाट्यछटा सादर करून सर्वांची मने जिंकून घेतली. काटकसरीची जाणीव ठेवून टाकाऊ वस्तूपासून अनेक चांगल्या व उपयुक्त वस्तू तयार करून त्याचे प्रदर्शनही त्यांनी मांडले होते. या आजींचे करावे तेवढे कौतुक थोडेच आहे.

कार्यवाह श्री. वि. के. मराठे यांच्या सूचनेनुसार २३ व २४च्या कार्यक्रमाचे व्हिडीओ शूटिंग केलेले आहे. त्यामुळे संमेलनात सहभागी झालेल्यांना पुन: प्रत्ययाचा आनंद घेता येईल. तर जे कुलबांधव अधिवेशनाला उपस्थित राहू शकले नाही त्यांनाही अधिवेशनाची झलक पाहता येईल. ***

---

## *युवा मंच आणि उद्योजकता मेळावा*

दि. २४-१२-२००३ रोजी सर्व युवक-युवतींचा Formula for Success हा कार्यक्रम प्रमोदन मराठे यांनी नियोजित केला होता. आयुष्यात यशस्वी होण्यासाठी मार्गक्रमाची आखणी, त्यासाठी लागणाऱ्या गुणांची जोपासना आणि वेळेचे नियोजन या संबंधी workshops घेण्याबाबत चर्चा झाली होती.

ज्या तरुण-तरुणींना शारीरिक, बौद्धिक आणि मानसिक शक्तींचे संवर्धन करण्याची इच्छा आहे, त्यांनी सौ. नीलांबरी रमेश किंवा कर्नल प्रमोदन प्रभाकर यांच्याशी संपर्क साधावा.

काही **उत्साही तरुण-तरुणींनी दि. ४ जानेवारी रोजी 'युवा मंच'हि स्थापला.** या मंचाचे नांव ठरवणे व काय कार्यक्रम करायचे या संबंधाने फेब्रुवारी मधे परत बैठक होणार आहे. या तरुण-तरुणींनी ठरवले आहे की वय ३५ पर्यंतच युवा मंचाच्या कार्यक्रमात भाग घेता येईल. ''आम्हाला हितगुज मधे जागा मिळेल का?'' असा प्रश्न त्यांनी विचारला आहे.

श्री. वि. के. च्या पुढाकाराने दि. २४-१२-२००३ ला छोट्या उद्योजकांची बैठक घेण्यात आली. श्री. मोहन मराठे, श्री. वि. के., रमाकांत विद्वांस, हेमंत मराठे आदिंनी या छोट्या उद्योजकांच्या समस्यांचे समाधान केले. काहींना आपापसातच चर्चेने उत्तरे मिळाली. या सर्वांचे पत्ते व फोन नं. पुणे शाखेकडे व प्रमोदन प्रभाकर यांच्याकडे आहेत. उपस्थितांच्या इच्छेनुसार असे उद्योजक मेळावे वा सहल-कम-मेळावे वारंवार व्हावे यासाठी पुणे शाखा जरूर प्रयत्न करील!

ज्यांना यात भाग घ्यायचा आहे, त्यांनी **प्रमोदन प्रभाकर यांना आपला पत्ता कळवावा.** फोन नं. २४२२४७८९ किंवा ९८२२२९०८७६. ***

***अधिवेशनाची ही फलश्रुती आश्वासक आहे. हितगुजमध्ये यासाठी जागा निश्चितच मिळेल. - संपादक***

Marathe Pratishthan

# अधिवेशनाची क्षणचित्रे




(१) क्षितिजा अरुण मराठे - दंतकीर्तन. (२) श्रीमती सुधा मराठे - कविता वाचन. (३) श्रीमती वैशाली खांबेटे - कीर्तन. (४) श्रीमती सुशीला दत्तात्रय - नाट्यछटा. (५) माहेरवाशीण सौ. पुराणिक - श्लोक वाचन. (६) श्री. आनंद व सौ. अनुराधा कट्टी - संगीत. (७) कविता वाचन - सौ. सीमा शाम व सौ. सुलभा सुरेंद्रनाथ. (८) सायली मराठे - 'ती फुलराणी' मधील एक दृश्य (९) सूर्यकिरण मराठे - तबला वादन (१०) बटाट्याची चाळ मधील एक प्रसंग - स्वराली मराठे व तिची मैत्रीण हर्डीकर. (११) सौ. अनुराधा मराठे - सुश्राव्य संगीत मैफल. (१२) मैफल ऐकण्यात रमलेले श्रोते. (१३) सौ. अनुराधा आनंद कट्टींना ओटी देताना सौ. मीना भालचंद्र. (१४) सतीश मराठे यांची मुलाखत ऐकताना श्रोतृवर्ग. (१५) व (१६) माहेरवाशिणींची पाठवणी. चित्ररचना - राजाभाऊ मराठे, मुंबई.

## या अंकात


१. **अधिवेशनाची क्षणचित्रे** ................ पृ.१, २ व १९
चित्ररचना राजाभाऊ मराठे, मुंबई

२. **मला भावलेले अधिवेशन**..................... पृ.३
विनायक केशव, वरळी, मुंबई

३. **'सासर'च झालं 'माहेर'**...................... पृ.३
मीता यशवंत, पुणे

४. **मराठे प्रतिष्ठानचे ७वे अखिल भारतीय अधिवेशन २२ ते २४ डिसेंबर २००३**.................. पृ.३
सौ. निर्मला श्रीपाद, पुणे, सौ. शैला गोपाळ, कराड

५. **परिचय काव्य**................................ पृ.४
सौ. शुभदा श्रीनिवास, ठाणे

६. **ब्याण्णव कुळी की शाण्णव कुळी**.............. पृ.५
सौ. राधा श्रीकांत, अंधेरी, मुंबई

७. **वरपक्षाचा पाहुणचार**......................... पृ.६
श्रीमती सुधा लक्ष्मण, भोपाळ

८. **पुणेकरांचे आतिथ्य**........................... पृ.६
सौ. राधा श्रीकांत, अंधेरी, मुंबई

९. **सतीश मराठे यांची मुलाखत**................... पृ.७
माधव वासुदेव, पुणे

१०. **आधी लगीन कोंडाण्याचे**..................... पृ.७
संपादक, हितगुज

११. **कृतज्ञ मी, कृतार्थ मी**......................... पृ.८
सौ. नीलांबरी रमेश, पुणे

१२. **निरोप देतो तुम्हाला**.......................... पृ.८
सौ. निर्मला श्रीपाद, पुणे

१३. **थकले रे नंदलाला**........................... पृ.८
सौ. राधा श्रीकांत, अंधेरी, मुंबई

१४. **२१वी सर्वसाधारण सभा ७.१२.२००३**..... पृ.९
विनायक केशव, वरळी, मुंबई

१५. **प्रतिष्ठानची गुणवत्ता पारितोषिके २००२-०३**. पृ.१२

१६. **गोमंतक मराठे परिवार संमेलन (२२ व २३ नोव्हेंबर २००३)**............. पृ.१३
शुभदा दीपक, शिरोडा-गोवा

१७. **प्रतिष्ठानची गुणवत्ता पारितोषिके २००१-०२** पृ.१५

१८. **गिर्यारोहण - सर्वांनी जोपासावा असा छंद**...... पृ.१६
हेमंत अरुण, नालासोपारा

१९. **तरुणवर्ग न येण्याचे कारण**................... पृ.१७
सौ. राधा श्रीकांत, अंधेरी, मुंबई

२०. **युवा मंच आणि उद्योजकता मेळावा**............ पृ.१८


याशिवाय **प्रतिष्ठान वृत्त** (पृ.९), **सभासद वृत्त** (पृ.१०,११) आणि **विवाह सहाय्य** (पृ.१६ ते १८) ही नेहमीची सदरे.

**बुक पोस्ट**

प्रति


**मराठे प्रतिष्ठान**
मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग,
प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.
(टे. नं. २४३०२४५३)


Marathe Pratishthan